# अध्याय ७३ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

दिव्य तेजस्वी प्रभु माणिक। भाषण मृदु पण मार्मिक ॥
मध्यम गौर आकर्षक। भक्तचिंता निवारिती ॥१॥

सर्वांस सर्वदा वाटावें। प्रभूंकडे पहात रहावें ॥
भाषणही अैकत बसावें। देहभान भक्त विसरे ॥२॥

विविध भाषा त्यांना येती। धर्मप्रमाण दाखविती ॥
गोड दयाळू श्रीदत्तमूर्ती। इष्ट ज्ञान सहज स्फुरे ॥३॥

प्रभूंना लोक द्रव्य अर्पिती। तें संपवून शीघ्र गती ॥
प्रभु काढिती हातोहातीं। रुपये आर्तांस द्यावया ॥४॥

श्रीदत्त योगेश अलौकिक। अवतार त्यांचे लौकिक ॥
श्रीपाद नरहरी माणिक। जगदोद्धार करावया ॥५॥

अेक शास्त्री फार विद्वान। प्रभुपदीं होते बहु दिन ॥
प्रभूंना सांगती आळवून। पंक्तिलाभ द्या मजला ॥६॥

प्रभु म्हणती सदा काळ। नाही भोजना एकच वेळ ॥
शास्त्री प्रार्थिती मज चालेल। प्रभु सांगती बेत उद्यां ॥७॥

मध्यरात्रीचे अगोदर। प्रभु बोलाविती सत्वर ॥
प्रभुहस्तीं ज्वारी भाकर। आणि चटणी लसणीची ॥८॥

तशी भाकरी झोळींतील। शास्त्रीबुवां मिळे ते वेळ ॥
परंतु झोंबे ती तत्काळ। पंक्तिबेत समजला ॥९॥

विद्वान शास्त्री विरमून। प्रभुचरणी झाले लीन ॥
प्रभु म्हणती प्रसाद छान। भाग्यानेंच लाभतसे ॥१०॥

पण केले त्यांचें समाधान। प्रभूचें असलेंच भोजन ॥
इतरां मात्र गोड पक्वान्न। भंडारखाना देत असे ॥११॥

हजारों लोक नित्य येऊन। घेती प्रभुपददर्शन ॥
वासना सफल होऊन। पावती समधान सर्वदा ॥१२॥



संकटी प्रभु धांव घेती। असे वर्णावे प्रसंग किती ॥
सर्वांस तारक योग मूर्ती। श्री माणिक प्रभु दत्त ॥१३॥

एकदां पंजाबी पैलवान। प्रभुपदीं मोठा अभिमान ॥
धरून अजिंक्य म्हणून। पत्र मागती तोऱ्यानें ॥१४॥

माणिक करिती समजूत। परंतु ते गर्विष्ठ बहुत ॥
डोंबारी येती इतक्यांत। कसरत पहाण्या प्रार्थिती ॥१५॥

प्रभु म्हणती कुस्ती करावी। अशक्य पण आज्ञा बरवीं ॥
वंदून कृपें मस्ती जिरवी। पैलवान शरणागत ॥१६॥

प्रभु सांगती गर्व नसावा। सर्वांचा सद्गुरु विसावा ॥
दोन्ही पक्षां संतोष व्हावा। अशी देणगी प्रभु देती ॥१७॥

प्रभूला मुलें प्रिय लहान। पाटलाला पुत्र संतान ॥
माणिककृपें झालें म्हणून। माणिक नांव ठेविले ॥१८॥

पाटील मुलास घेऊन। गुरुवारीं घेतसे दर्शन ॥
जरी पुत्र त्याचा लहान। तरीही लीन प्रभुपदीं ॥१९॥

एकदां आपल्या शेतांत। खेळतां खेळतां भान जात ॥
पडला खोल विहिरींत। हाक मारी प्रभुराया ॥२०॥

प्रभुलीला कोण वर्णील। अधांतरी माणिक बाळ ॥
धरून प्रभु करी सांभाळ। बाळ खेळत प्रेमानें ॥२१॥

विहिरींत दोर सोडून। एक मनुष्य उतरून ॥
बाळा काढीतसे जपून। बाळ सुखरूप सांपडे ॥२२॥

बाळ म्हणें मी विहिरींत। प्रभूसह होतों खेळत ॥
माता पिता जन बहुत। विस्मयचकित जाहले ॥२३॥

प्रभुपदीं बाळास नेऊन। करिती साष्टांग नमन ॥
प्रभु पुसती मुला लहान। कथिले नांव माझें ॥२४॥

प्रभु सर्व काही करिती। पण असावें गुप्त म्हणती ॥
प्रभुलीला सदाच घडती। चरित्र त्यांचें गूढ असे ॥२५॥



सर्व ब्रह्मांड दत्तरूप। तेथें नसे जाति विकल्प ॥
शुद्ध मनें श्रीदत्तरूप। कोणी केव्हांही भजावें ॥२६॥

एकदां प्रभुदरबारांत। तेज:पुंज फकीर येत ॥
आपला लोटा भरून मागत। तात्या भरिती रुपयांनी ॥२७॥

परंतु लोटा न भरला। त्यांनीं तो प्रभूंकडे दिला ॥
प्रभुरायें प्रसाद घातला। दोन खारका कांहीं फुले ॥२८॥

लोटा उल्हासून भरत। साई प्रसाद पुरे म्हणत ॥
लोटा उलटून ओतीत। रुपये पूर्वी भरलेले ॥२९॥

रुपयेढीग मोठा दिसला। फकीर साई निघून गेला ॥
विविध साधु प्रभु पदाला। वंदून जाती नेहमीं ॥३०॥

चंद्रमा वसे श्रीदत्तांत। मधु विद्या वेद सांगत ॥
चांगलें दत्तास आवडत। दत्त पंथ शाखा बहु ॥३१॥

ईड धातु अर्थ पूजन। मासारंभीं चंद्र दर्शन ॥
वेदांत वर्षही चांद्रमान। ईडगृह इदगाह दिसे ॥३२॥

महबूब सुबहानी संत। सूफी यवन त्यांचे भक्त ॥
ग्यारवी सण रज्जब मासांत। दिन अकरावा होतसे ॥३३॥

कादरिया पंथी यवन संत। ग्यारवी पाळण्यात सांगत ॥
हा संत जसा अवधूत। असें मानिती भक्त त्याचे ॥३४॥

आपल्या डोकीवरील ताज। त्यावर चबुतरा विराज ॥
जे मुसलमान भक्त निज। उत्तरेस छल्ला त्यां करितां ॥३५॥

ग्यारवीस जमती फकीर। त्यांना खैरात प्रभु उदार ॥
परंतु माणिक प्रभुवर। वैदिक आचार पाळिती ॥३६॥

माणिकप्रभाकर संस्कृत। चरित्र बाप्पाचार्य लिहीत ॥
ते नि:स्पृह माणिकभक्त। प्रभुकुलाचे आप्त होती ॥३७॥

भालचंद्र दीक्षित पुण्यवान। अंतकाळी प्रभुस्मरण ॥
करितां यज्ञकुंडांतून। माणिक प्रभु प्रकटती ॥३८॥

त्यांचे दर्शन डोळे भरून। घेऊन प्रणवोच्चारण ॥
करिती देहविसर्जन। जाती मोक्षास प्रभुकृपें ॥३९॥

दुसरे विठ्ठल तेर पल्ली। नम्र प्रभुपदकमळी ॥
कारकुना श्रीसत्ता मिळाली। तालुकदार प्रभुकृपें ॥४०॥

श्री माणिक प्रभु चरित्र। गाती नित्य भक्त सर्वत्र ॥
भक्तिभावें करून एकत्र । सारसंग्रह या ग्रंथीं ॥४१॥

माणिक संस्थान प्रकाशित। चरित्र अन्यही भक्त लिहीत ॥
प्रभुकृपेचे सर्वही भक्त। त्यांना वंदन आदरें ॥४२॥

दत्तजयंती वगैरे उत्सव। माणिक नगरीं होत सदैव ॥
तेव्हां स्वस्त जिन्नसभाव। तरीही खर्च लक्षावधि ॥४३॥

आचारी वाढती शत शत। सहस्त्रावधि विप्र जेवीत ॥
तसेच अन्य लोक असत। खर्च अफाट प्रभुनगरीं ॥४४॥

प्रभुमुखीं काव्यें प्रकटती। त्यांत अपार श्रीगुरुप्रीती ॥
भक्तीनें कवनें ओथंबती। लीलानाटकी सद्गुरु ॥४५॥

श्री माणिक प्रभु सांगती। देहाची सरे जीवनगती ॥
काळ पुळीला आमंत्रिती। भक्तपातकें निरसाया ॥४६॥

श्री प्रभूच्या आज्ञेसमान। अपरात्रीं स्वत: खपून ॥
समाधींचें उत्तम स्थान। तयार केलें शिष्यांनी ॥४७॥

अक्कलकोटीं नृसिंहभान। कथिती उद्यां चैतन्यघन ॥
माणकेश्वर यति होऊन। समाधि घेती स्वनगरीं ॥४८॥

सत्राशें सत्याऐंशीं शकांत। दत्तजयंति उत्सवांत ॥
भौमवारी एकादशी येत। सर्वां आशीर्वाद मिळे ॥४९॥

सकाळी संन्यास घेऊन। दोन्ही पुतणे निरीक्षून ॥
ज्येष्ठा मंत्रोपदेश करून। माला गळ्यांत घातली ॥५०॥

आपला दुशाला पांघरवून। महा प्रसाद पूर्ण देऊन ॥
कनिष्ठालाही माळ घालून। प्रेमें प्रसाद ओपिला ॥५१॥



त्यांना घराकडे धाडिती। आपण समाधिस्थानीं बसती ॥
श्रीगुरु चरित्र ग्रंथ पुढती। भावें पूजन जाहलें ॥५२॥

श्रृंगारिलें समाधिस्थान। दीप तेजे सुगंधें भरून ॥
दैवी चमत्कार घडून। देवही वंदिती प्रभुदत्ता ॥५३॥

गुद शिश्न नाभि हृदय। कंठ भृकुटी-मधून जाय ॥
षट्चक्र-भेद मस्तकीं ठाय। पंचप्राणा ब्रह्मरंध्री ॥५४॥

श्री माणिक समाधि लाविती। शिष्य प्रेमें उचंबळती ॥
समाधि-द्वार बंद करिती। गवाक्ष द्वार उघडें असे ॥५५॥

मस्तक-भेद संध्याकाळीं। गवाक्षही बंद तत्काळीं ॥
माणिकज्योति चैतन्यीं विरली। तरी राहिली भक्तां कृपा ॥५६॥

लिहितां माणिक सांगती। जरी संपली लोक-रीती ॥
तरी अखंड श्रीदत्तमूर्ती। भक्तां माणिक तारी सदा ॥५७॥

त्याचें मधुर आश्वासन। त्यांना भावें सदा नमन ॥
त्यांची कृपा पूर्वीसमान। भक्तां प्रत्यय येतसे ॥५८॥

माता आधींच मुक्त होत। दोन्ही बंधु योगी बनत ॥
ब्रह्म-निर्वाण पूर्वी घडत। सर्वां नमस्कार असो ॥५९॥

ज्येष्ठ पुतणे अप्पा योगी। मनोहर नृसिंह त्यागी ॥
सात वर्षांचे त्या प्रसंगीं। प्रभूची गादी चालविती ॥६०॥

बडे भाई त्यांना म्हणती। बारा वर्षांनी ब्रह्मीं जाती ॥
खंडेराव पीठस्थ होती। बंधु-द्वया प्रणिपात ॥६१॥

श्री माणिक प्रभूची गादी। चालविती दत्त अनादी ॥
भक्त-मंडळी श्रीप्रभु-पदीं। असे आसक्त भक्तिभावें ॥६२॥

चारी पुरुषार्थ साधवून। माणिक-मूर्ति दयाघन ॥
देती भक्तां ब्रह्म-सोपान। संकटें आपोआप विरती ॥६३॥

लिहितां माणिक सद्गुरु। दर्शन देती मनोहरू ॥
आश्वासून अभय-करु। मस्तकीं ठेविती नमूं तयां ॥६४॥



अक्कलकोटीं दत्तावधूत। तुरीयावस्थीं सदा रत ॥
अध्यात्म-सागर उल्हासत। भक्तां तारक नेहमीं ॥६५॥

ईश्वरी ज्योती प्रकाशली। देशीं परदेशीं वार्ता गेली ॥
मोठ मोठी साधु मंडळी। येती मिळवाया गुरुकृपा ॥६६॥

गुरु पादुकांचा आधार। लोकां वाटत निरंतर ॥
नाना स्थानीं भाविक नर। पीडा जाऊन तरती सदा ॥६७॥

भोसले शिंदे सरकार। गायकवाड होळकर ॥
पटवर्धन नृपवर। राजेराय वगैरे ॥६८॥

तसेच सर्व जातीचे जन। स्वामि-समर्थ-पदीं लीन ॥
जे दांभिक भक्त बनून। येती त्यांचे गुपित फुटे ॥६९॥

मुंबईचे कांहीं इसम। येतां म्हणती पुरुषोत्तम ॥
एकमेकांच्या स्त्रियांचे प्रेम। आणि पीडितां इतरांना ॥७०॥

ते दुर्गुणी बनती भक्त। मग त्यांवर कृपा होत ॥
एकदां एक नर पुसत। स्वामीची जात काय असे ॥७१॥

स्वामि सांगती घे ऐकून। आम्ही यर्जुवेदी ब्राह्मण ॥
काश्यप गोत्र राशी मीन। नृसिंहभान नांव असे ॥७२॥

तुझी कन्या सदा फिरत। फलाण्यासह शहरांत ॥
तिची कोणती सांग जात। तो नर वंदी शरमून ॥७३॥

मार्गात कोठे असे सूत। तर बाई जपून येत ॥
श्रीगुरूला नैवेद्य करीत। फार सोंवळी बाई दिसे ॥७४॥

गुरु म्हणती असलें अन्न। नावडे जा तूं त्वरें घेऊन ॥
नाटकी जारास देऊन। सोंवळें दाखव त्याकडे ॥७५॥

बाईचें पाप उघडें झालें। तिचें देहभान उडालें ॥
शुद्ध मनच आवडलें। गुरूला सदा भक्तीचें ॥७६॥

बाह्य सोंबळे आचरण। करी प्रेमें दुराचरण ॥
पापीच त्याचें अंत:करण। दुरावतसे गुरुकृपा ॥७७॥

ज्यास पाहिजे गुरुवर। त्यानें सुधारावा विचार ॥
आणि पाळावा यथाचार। गुरूची कृपा होतसे ॥७८॥

जरी पाप घोर घडलें। तरी स्मरा गुरु-पाऊलें ॥
मनापासून सुधारलें। तर पावेल गुरुनाथ ॥७९॥

स्वामींची कीर्ति ऐकून फार। एक इंग्रज़ बॅरिस्टर ॥
कलकत्त्याचे राहाणार। पातले श्रीगुरु-दर्शना ॥८०॥

समर्था केले भावें नमन। पुसे प्रश्न आदरें भिन्न ॥
येथें कोठून आगमन। श्रीगुरु प्रेमें सांगती ॥८१॥

कर्दळी वनीं केली वस्ती। तेथून चालतों पुढती ॥
नाना स्थानीं फिरून भारतीं। आलों अक्कलकोटास ॥८२॥

ऐकून सर्वां आनंद होत। माहिती गुरुचरित्रांत ॥
कर्दळीवनीं गुरु जात। तेच स्वामि हे असती ॥८३॥

लोक-कल्याण करावया। पुन्हां दिसली त्यांची काया ॥
सर्वांवरी धरिती माया। करिती छाया कृपेची ॥८४॥

श्रीगुरुदत्त महाराज। प्रज्ञापुरीं झाले विराज ॥
प्रत्येकाचे मनीं सहज। असती शिव दत्तगुरु ॥८५॥

श्रीगुरु अक्कलकोटांत। आसपास गांवीं फिरत ॥
सर्व राजचिन्हें असत। पालखी छत्र चामरें ॥८६॥

गाड्या घोडे कुतरी गाई। हरिदास पुराणिक गवई ॥
सेवेकऱ्यांची होई घाई। यात्रेकरूही असंख्य ॥८७॥

नाना वाद्ये वाजविणार। मेवा मिठाई दुकानदार ॥
नाना पदार्थ विकणार। चालतें नगर तें दिसे ॥८८॥

स्वामि-समर्थ महाराज। अनंतकोटी ब्रह्मांड राज ॥
मानवी भूप साधुराज। त्यांना नमिती नवल नसे ॥८९॥

थाटमाट दिसे बहुत। परी त्यांत गुंता नसत ॥
जे आत्मानंदी सदारत। त्यांना उणे काय असे ॥९०॥



त्यांचेकडे जे येती लोक। त्यांतील संसारी भाविक ॥
त्यांना प्रसाद सुखदायक। कुलदैवत मूर्ति मिळे ॥९१॥

जे कोणी त्यांचेच सेवेकरी। त्यांनी गुरुची सेवा बरी ॥
केल्यास त्यांत सर्वपरी। येती असा गुरु-बोध ॥९२॥

ज्याचा जितका अधिकार। तितका बोध गुरुवर ॥
देऊन तारिती खरोखर। सुखाचा मार्ग नेई सुखीं ॥९३॥

आपापला धर्म पाळून। विधायक वृत्ति धरून ॥
सेविती गुरूला समाधान। कृपा लाभे शुद्ध भावें ॥९४॥

जे जे कोणी असती भक्त। त्यांना अंतीं ज्ञान मिळत ॥
जरी अज्ञानी दिसे जीवित। तरी पुण्य सांठा श्रीपदीं ॥९५॥

अल्पायुषी मुलासहित। काशीचे बहिरे शास्त्री येत ॥
त्यांना कोणी साधु सांगत। गुरु तारिती प्रज्ञापुरीं ॥९६॥

गुरु-सेवेंत शास्त्री रत। भविष्य सम मुलगा मृत ॥
गुरु सांगती शर्करायुक्त। तिळ खावे चिंता नको ॥९७॥

तसे घालितां तीळ मुखांत। मुलगा होतसे जिवंत ॥
बहिरे शास्त्री आनंदत। मुलासह नमिती श्रीगुरूला ॥९८॥

मुलगा सदाचारी उत्तम। काशींत झाला ख्यात नाम ॥
श्रीगुरु-कृपा अनुपम। भक्तां पावन करीतसे ॥९९॥

श्रीपाद श्रीवल्लभमूर्ती। माणिकयति नृसिंहयति ॥
त्र्याहात्तरावा अध्याय येती। श्रीदत्त प्रेमें भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयपर्णमस्तु



## अध्याय ७४ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

पंगु रोगी दुष्ट दुर्जन। गुरुकृपें होती पावन ॥
दत्तावधूत नृसिंहभान। नमूं श्रद्धाभक्तीनें ॥१॥

नारायणदास ब्राह्मण। गुजराथी नागर कृपण ॥
बीड शहरीं एक ब्राह्मण। त्याचे घरीं ये वाटसरू ॥२॥

देवता साधु तीर्थ वर्णन। आनंदें करी मनापासून ॥
म्हणे दिव्य पुरुषदर्शन। अक्कलकोटीं झालें मला ॥३॥

अवतारिक श्रीगुरुयती। नागर म्हणजे तयाप्रती ॥
उगी रहावें असे असती। साधु पुष्कळ या जगीं ॥४॥

लोकां चमत्कार दाविती। पोटार्थी आळशी भुलविती ॥
विप्र म्हणे हे तसे नसती। व्यर्थ निंदा करूं नका ॥५॥

दुसरीकडे तो निघून गेला। नारायण पत्नी त्यावेळां ॥
कष्टें भोगी प्रसूतिकळा। पण बाळंत न होतसे ॥६॥

सर्व लक्षण दिसतसे। अठरा मास गेले असे ॥
कांता अपार कष्टतसे। म्हणे देवा मरण देई ॥७॥

नारायणदास कळवळे। मनीं म्हणे श्रीगुरु कोपले ॥
देवा क्षमा करा सगळे। अपराध माझे कृपेनें ॥८॥

मनोभावें शरण जात। अतीतवेषें श्रीगुरु येत ॥
नागरास तेव्हा पुसत। कां रें क्षोभविला वाटसरू ॥९॥

नागरास खुणा पटली। म्हणे अंतर्साक्षी माउली ॥
करावी कृपेची साउली। लीन स्वरें बोलतसे ॥१०॥

तेव्हां पुसती इतर जन। सांगा सुखप्रसूति साधन ॥
अतिथि म्हणे करा गमन। अक्कलकोटीं श्रीपदीं ॥११॥

सहस्त्र रुपये खर्चून। रुद्राभिषेक विप्रभोजन ॥
यथासांग गुरूपूजन। करा पुत्र हवा तर ॥१२॥

नारायणदास सांगत। आज अस्तमाना पर्यंत ॥
सुखें भार्या झाली प्रसूत। आणि मुलगा जन्मला ॥१३॥

तर हें मी खचित करीन। अतिथि पावला अंतर्धान ॥
संध्याकाळीं पुत्र जन्मून। सर्वा आनंद जाहला ॥१४॥

पुत्रजातक वर्तविलें। ग्रहमान उत्तम दिसलें ॥
चार पांच महिने झाले। माता पुत्र सुखरूप ॥१५॥

तरी तो नारायणदास। जाईना धीपुरीं दर्शनास ॥
मग कांता आणि मुलास। कांहीं व्याधि उद्भवली ॥१६॥

पत्नी म्हणे चला लौकर। नागर कोपला सत्वर ॥
करुं लागला वेडेचार। श्रीगुरुक्षोभ होतसे ॥१७॥

बायको धरून विश्‍वास। करी गुरुवारचा उपास ॥
नागरमातेचें मानस। सांगे जावें प्रज्ञापुरा ॥१८॥

सर्व मंडळी कारकून। श्रीपदीं करिती आगमन ॥
गुरुनाथ बोलती पाहून। कां रे मदांधा मातलासी ॥१९॥

चार मास राहिल्यावीण। बरा न होसी सत्य जाण ॥
त्यांना समर्थआज्ञा प्रमाण। चार मास तीं राहिलीं ॥२०॥

चांगला विप्र कांता कुमर। फेडी नवस यथा प्रकार ॥
आज्ञा घेऊन जात गुर्जर। आदरें गुरुभक्ति करी ॥२१॥

गुरुपाशीं भाव निर्मळ। प्रेमें ठेवावा सर्वकाळ ॥
मग गुरु दत्त दयाळ। सत्वर होती सुप्रसन्न ॥२२॥

ब्रह्मनिष्ठ वामन बुवा। एकदां कंटाळले जीवा ॥
ते रहाती बडोदें गांवा। असह्य कष्ट व्याधीचे ॥२३॥

मग नाहीं धरवला धीर। प्राण देण्या जाती सत्वर ॥
जलाशयीं उडी टाकणार। इतक्यांत श्रीगुरु पातले ॥२४॥

वामनास वर ओढून। करिती श्रीमुखीं ताडण ॥
म्हणती हेंच का ब्रह्मज्ञान। कळलें शरीरत्यागाचें ॥२५॥



देह भोग संपे पर्यंत। सहज समाधींत चित्त ॥
ठेवून प्रारब्ध निश्‍चित। भोगिलें पाहिजे आपुले ॥२६॥

बुवांच्या शरीरावरून। स्वामींनी हात फिरवून ॥
आरोग्य मिळेल सांगून। घरीं आणिले प्रेमानें ॥२७॥

मग तत्काळ अवधूत। तेथल्या तेथें झाले गुप्त ॥
भक्तासाठीं दत्तावधूत। प्रेमें प्रकटती सर्वदा ॥२८॥

वामनरावजी बामोरीकर। त्यांचे व्याधीस पडे उतार ॥
गुरुरायाचे ते भक्त थोर। सभक्त गुरूला नमन असो ॥२९॥

स्वामिसारखा प्रेमकर्ता। कोणी न मिळे कधीं आर्ता ॥
भक्त जनांची त्याला वार्ता। लगेच कळे इष्ट पुरवी ॥३०॥

स्वामिराज प्रज्ञापुरांत। अंगींचा सुगंध पसरत ॥
लोकांस आश्‍चर्य वाटत। सर्वांचें लक्ष श्रीपदीं ॥३१॥

प्रेम मत्सर कोप वासना। कशीही निष्ठा गुरुचरणा ॥
ठेवितां गुरु आपले मना। इहपर नेती स्वठायीं ॥३२॥

श्रीगुरु यति दयाघन। भक्तां देती प्रसादभोजन ॥
श्वान यवनाचेंही उष्टें अन्न। कधीं घ्यावया सांगतीं ॥३३॥

त्यामुळें भक्तांचीं कामे होती। गुरुशब्द फळास येती ॥
कधीं हाडकें भक्तां देती। सुवर्ण त्यांचें होतसे ॥३४॥

केव्हां केव्हां दतावधूत। जमले जरी खूप भक्त ॥
प्रत्येका दाविती इष्ट दैवत। एकाच वेळीं स्वरूपीं ॥३५॥

स्वामींचें तेज दिव्य असे। डोळ्यांना असह्य होतसे ॥
म्हणून श्रीगुरु धरीतसे। सौम्य तेज निरंतर ॥३६॥

राजा अथवा रंकाप्रती। स्वामीची वाटे आदरें भीती ॥
कोणी दुष्ट पापी असती। त्यांना खरीच भीति दिसे ॥३७॥

श्रीगुरुपुढे सर्व शांत। सदा नम्रपणें बोलत ॥
भक्तां वाटती दत्तावधूत। आप्तासमान नेहमी ॥३८॥



गुरुदर्शनें इष्टप्राप्ति। पाप ताप शाप नासती ॥
मांत्रिक दुष्कृत्यें उलटती। भक्तरक्षण करिती गुरु ॥३९॥

कोणा प्रसाद काळी माती। चांदी बनली अतर्क्य प्रीती ॥
विहिरी उन्हाळ्यात आटती। स्वामिकृपे जल येतसे ॥४०॥

कधीं पाऊस न पडत। लोक बहुत चिंताक्रांत ॥
कृपा करितां पर्जन्य येत। सर्वत्र सत्ता श्रीगुरूची ॥४१॥

जरी केव्हां अन्न संपत। तरी तें स्वामि वाढवीत ॥
श्रीगुरु तेथें उणे नसत। व्यवस्था लागे गुरुकृपें ॥४२॥

लांब लांबून येती भक्त। नैवेद्य नाना पक्वान्न युक्त ॥
कांही दुष्ट कुतर्क करीत। गुरु खाती लाल मिरच्या ॥४३॥

शंकेस जागा न ठेविती। एकदां पाटावर उमटती ॥
गुरुपादुका अभय देती। जोशी मठांत पाट असे ॥४४॥

बहुत स्थानें प्रज्ञापुरांत। स्वामि सर्वांस आवडत ॥
सदा बायका गाणीं म्हणत। वर्णिती लीला श्रीगुरूची ॥४५॥

इमारत उत्तम बांधून। ब्रह्मानंद गुहा करून ॥
श्रीगुरूचें समाधिस्थान। बुधवार पेठेत जाहले ॥४६॥

कोठेही शरीर ठेविलें। तरी हेच स्थान आवडलें ॥
म्हणून भक्तां सांगितलें। केव्हां गुहेंत गुरु बसती ॥४७॥

देवता-स्थापन तेथें होत। सत्राशें पंचाण्णव शकांत ॥
माघ पौर्णिमे रविवार येत। शास्त्रोक्त अर्चा जाहली ॥४८॥

श्रीसिद्धि विनायक दैवत। श्री आम्रकोटेश्‍वर उमाकांत ॥
शुक्ल पक्षीं बालार्कवत। लिंग कृष्ण कृष्णपक्षीं ॥४९॥

श्रीदत्तात्रेय गुरुपादुका। भक्तां सदा आनंददायिका ॥
गुरुस्थानीं सुखकारिका। सर्व देवता वास करिती ॥५०॥

स्वामिसमर्थ दत्तावधुत। तेव्हां ब्रह्मानंद गुहेंत ॥
बसले होते आनंदभरित। बाहेर येती निजानंदे ॥५१॥

डंके वाजले जयजयकार। उच्चस्वरानें यतिवर ॥
चतुर्वेद -मंत्र सत्वर। म्हणतां स्थापना पूर्ण गमे ॥५२॥

वेद-मंत्र-स्वामि-मुखांत। ऐकून सर्व आनंदत ॥
स्वामि-समर्थ सर्वां सांगत। आशीर्वचन उत्तम ॥५३॥

जे कोण या दिव्य स्थानांत। यथाचार सेवा करीत ॥
त्यांचे मनोरथ पूर्ण होत। सत्य सर्वदा जाणावें ॥५४॥

कोणी अविश्वास धरील। तो महा दुःखांत पडेल ॥
ब्रह्मानंद गुहा निर्मळ। स्थान आमुचें निरंतर ॥५५॥

जरी सर्व ठायीं गमन। तरी आमचें हेंच स्थान ॥
असें सर्वांनीं नित्य मानून। सेवाभाव आचरावा ॥५६॥

वेदोक्त धर्म सनातन। सुखी होती संपूर्ण जन ॥
करावया भक्त-पालन। युगायुगीं अवतरतों ॥५७॥

आनंदें देवता स्थिरावती। विधिपूर्ण, विप्र जेविती ॥
इतर जनही तृप्त होती। मिळतां प्रसाद भोजन ॥५८॥

पूर्वी खेळांत गुरुवर। येथेंच लाविती औदुंबर ॥
कुशतीर्थही मनोहर। गो समाधि येथें असे ॥५९॥

श्रीसमर्थ प्रज्ञापुरांत। असतां खूप लीला होत ॥
माधवशास्त्री गुरुभक्त। आले श्रीपदीं भक्तीनें ॥६०॥

भीमातीरीं गांव शिरगुर। त्यांना चालत जहागीर ॥
पण कर्ज वाढलें फार। पत्नी त्यांची निवर्तली ॥६१॥

गुरु बोलती मंगल वचन। अति सुमुहूर्त सावधान ॥
प्रसाद मिळतां केलें गमन। शिरोळग्रामीं आप्तांकडे ॥६२॥

त्यांच्या घरीं दोन कन्यांनें। लग्न ठरलें होतें साचें ॥
त्यांतील कनिष्ठ कन्येचें। वर-मंडळ पातलें ॥६३॥

परंतु वडील कन्येचें। कांहीं दुश्चिन्ह वराकडचे ॥
घडे म्हणून वैगुण्य त्याचें। मानून लग्न मोडलें ॥६४॥



वधुपिता चिंता करीत। इतक्यांत माधव जात ॥
परस्पर विचार होत। लग्न घडलें अनायासें ॥६५॥

मग माधव भार्येसहित। गुरुपदीं येती प्रज्ञापुरांत ॥
भावें पूजितां दत्तावधूत। प्रसाद देती आनंदें ॥६६॥

माधवशास्त्री घरीं जात। कर्ज फिटलें संतति होत ॥
मध्व-संप्रदायी असत। मान वैष्णवां फार देई ॥६७॥

श्री व्यंकटेश गिरीवर। श्री व्यंकटेश देववर ॥
माधवशास्त्री द्विजवर। प्रेमें गेले तीर्थयात्रे ॥६८॥

तेथें मार्गात यतिवर। असती त्यांना नारीनर ॥
करीत होते नमस्कार। दर्शनार्थ लोक जमती ॥६९॥

माधव आश्चर्यचकित। वंदून स्वामींना पुसत ॥
आपण होतां प्रज्ञापुरांत। केव्हां येणें होत येथें ॥७०॥

श्रीगुरु सांगती माधवासी। सदाच आहें या स्थानासी ॥
विटलों भेद कपटासी। नको नकोच अन्न तें ॥७१॥

माधव मनीं विरमती। तेथील आचार आचरिती ॥
भावें अक्कलकोटा येती। वंदून म्हणती मी चुकलों ॥७२॥

श्रीगुरु प्रेमानें सांगती। मान सर्वां समान चित्तीं ॥
सदोदित हरि-गुर-भक्ति। निर्मळ मानसें करावी ॥७३॥

तसें मग माधवाचरण। संस्कृत चरित्रीं गुरु-गुण ॥
वर्णी मनोभावें आपण। गुरूंना नमन भक्तांसह ॥७४॥

गुरुरायाच्या अनंत लीला। एकदां नेत्र-रोगी आला ॥
त्याला सांगती डोळा चांगला। होईल घाल गजमूत्र ॥७५॥

मिरीं व कडुनिंब पानें। समंध बाधा जावया खाणें ॥
जलोदरही बरा होणें। कडुनिंबाचे रसाने ॥७६॥

गाय प्यालेले उष्टे जल। कोणा आपला विष्टा मल ॥
जळकें लाकूड कांहीं वेळ। कुष्टादि रोग बरे करी ॥७७॥



म्हशीचें ताजें शेण ऊन। शस्त्र-जखमेस बांधवून ॥
करिती भक्ताचे रक्षण। श्रीगुरु सिद्ध योगेश्वर ॥७८॥

एकदां कपटी लोकांनीं। विषारी पदार्थ आणोनी ॥
श्रीगुरुला दिले कुमनीं। श्रीगुरु तेही स्वीकारिती ॥७९॥

गुरु-प्रकृति बिघडली। दुष्ट मंडळी सुखावली ॥
परी श्रीगुरु चंद्रमौळी। विष टाकिती पचवून ॥८०॥

श्रीगुरु सर्वरूप असे। भक्तांना जवळ घेतसे ॥
पातक्यांना टाकीत नसे। मात्र चांगलें सदा शुभ ॥८१॥

तृण काष्ठ जल पाषाण। यांचीही आवड धरून ॥
गुरु पुसती त्यां लागून। आणि इच्छा पुरविती ॥८२॥

दृश्य अदृश्य नाना योनी। चैतन्य भरे पूर्णपणीं ॥
नृसिंह गुरु सर्व ज्ञानी। काळजी त्यांना विश्वाची ॥८३॥

ब्रह्म शाश्वत निर्दोषसम। तसे श्रीगुरु पुरुषोत्तम ॥
अत्रितप देत आराम। श्रीदत्तरूपें जगतांला ॥८४॥

जंगम संस्थान-महंत। श्रीगुरूला भावें नमीत ॥
जैन यहुदी लिंगाइत। म्लेंछ ख्रिस्ती गुर-भक्त ॥८५॥

जिवंत स्वामि होत अदृश्य। तरी भक्तांना भेट अवश्य ॥
पुढें ही भेटती हें भविष्य। नाहींच खोटें होणार ॥८६॥

इष्टकालीं जनां तारावें। म्हणून अवतारीं व्हावें ॥
दिव्य रूपानें वावरावें। श्रीदत्त-रूपें चालू असे ॥८७॥

जगद्गुरु-पीठ संकेश्वर। श्रीशंकराचार्य नमस्कार ॥
आचार्य अधिकारी थोर। येती गुरुपदीं प्रज्ञापुरीं ॥८८॥

स्वामिचरणीं झाले लीन। भावें केले गुरुस्तवन ॥
नृसिंहभान संतोषून। आचार्यां क्षेम सांगती ॥८९॥

जगद्गुरुही आनंदून। चित्तीं पावले समाधान ॥
लोकां सांगती कृपावचन। स्वामि ईश्वरी अवतार ॥९०॥

त्यांचें करूं नये छलन। वागावें उपदेशा-समान॥
लाभेल सुख समाधान। आशीर्वाद तुम्हां असो ॥९१॥

श्रीमदाद्य शंकराचार्य। भारतीं करिती दिग्विजय॥
त्यांची कृपा असे अक्षय। त्यांना नमन अत्यादरें ॥९२॥

त्यांचेच पीठ चालविती। कल्याणाचा मार्ग दाविती॥
जगद्गुरु व नृसिंहयती। दोघां नमन पूज्य भावें ॥९३॥

पुढ्यांत असून गुरुमूर्ती। जे पातकी फार असती॥
त्यांना न दिसे नृसिंहयती। स्तवितां दर्शन होतसे ॥९४॥

श्रीगुरुची अमित शक्ति। त्यांची सदा विरक्त वृत्ति॥
सेवेकऱ्यांची जाहली मस्ती। तर ती जिरे परस्पर ॥९५॥

मुंबईस वाळकेश्वर। गुरुप्रिय नर्मदातीर॥
नेपाळांत पशुपतीश्वर। मानसतीर्थ पवित्र ॥९६॥

भारतीं व भारता बाहेर। सदा फिरती गुरुवर॥
दत्त अवतार नर। किती किती लीला लिहूं ॥९७॥

चैतन्यमय विश्व सकळ। ब्रह्ममाया एक निर्मळ॥
स्वार्थ परार्थ अेकमेळ। शुद्ध मानसी दत्त गमे ॥९८॥

सगुण निर्गुण भेदातीत। सर्वत्र सदा आत्रेय दत्त॥
पुरवी आशा करतो मुक्त। वासना अंत सुखशांती ॥९९॥

श्रीगुरु तुझी अगाध लीला। तवकृपेचा अध्याय भला॥
चौऱ्याहत्तरावा अर्पण केला। श्रीदत्त घेती भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु



# अध्याय ७५ वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः। श्रीसद्गुरवे नमः॥

श्रीनरसिंह गुरुवर। फिरून सर्व भूमीवर॥
आपलें स्थान निरंतर। करिती अक्कलकोटासी ॥१॥

दत्तावधूत स्वामिसमर्थ। पुरविती भक्तमनोरथ॥
नवस फेडून कृतार्थ। होती असंख्य नरनारीं ॥२॥

भक्तीनें करिती नमस्कार। रुपये वस्त्रें अलंकार॥
फळें मालाधूप कापूर। पेढे श्रीफलादि अर्पिती ॥३॥

सेवेकरी तेथें असती। त्यांचीच ती होतसे प्राप्ती॥
आपसांत कलह करिती। पण विरक्त गुरुनाथ ॥४॥

पहांटेपासून रात्रीपर्यंत। भक्तमाणसें अगणित॥
सरकार पंच नेमीत। सेवेकरी खिन्न होती ॥५॥

बाळाप्पा श्रीमंत माणूस। पण विरक्त बहुवस॥
सेवा करी गाणगापुरास। दृष्टांत जावया धीपुरीं ॥६॥

प्रज्ञापुरीं मग येऊन। गुरुपदीं करी वंदन॥
स्वामिसमर्थ आश्वासून। अभय देती आनंदें ॥७॥

बाळाप्पा उत्तम सेवेकरी। अभिलाष नसे अंतरीं॥
संपत्ति त्याची असे घरीं। कष्टाळु भक्त श्रीगुरूचा ॥८॥

मराठा मुंबईहून येत। हरिभाऊ असती भक्त॥
समर्थ म्हणती स्वामिसुत। कृपा करूनी सांगती ॥९॥

ध्वज उभारून मुंबईस। जन लावणें भक्तिमार्गास॥
वंदून आज्ञा, धरी विश्वास। कांदेवाडीत मठ असे ॥१०॥

कवनें करी दंग भजनीं। नाचत खडावे घालुनी॥
एकदां प्रज्ञापुरीं येउनी। भजनीं नाच करीतसे ॥११॥

स्वामि सांगती नको खडावे। अैकून भक्तचित्त दुखावे॥
मुंबईस जात स्वभावें। गर्विष्ठ स्वभाव पालटेना ॥१२॥



समर्थ सांगून धाडिती। यावें अक्कलकोटाप्रती॥
परंतु आज्ञा न वंदिती। अकालीं देह गळतसे ॥१३॥

लहान बंधूस विरक्ती। उपजे अेकनिष्ठ भक्ती॥
स्वामिसमर्थ आज्ञापिती। मुंबईस जात मठकार्या ॥१४॥

स्वामिसुत काव्यांत सांगती। छेली ग्रामीं समर्थ मूर्ती॥
चैत्रशुद्ध द्वितीयेप्रती। प्रकटली भक्तहितार्थ ॥१५॥

दतांना मुलें आवडती। दत्त नाना रूपें धरिती॥
श्रीनृसिंह सरस्वती। जन्म तेराशें शकाकडे ॥१६॥

स्वामिसमर्थ मंत्र सांगती। तो जपून भक्त तरती॥
जपसंख्येची हवी गणती। कामनापूर्ती गुरुकृपें ॥१७॥

काजळे ग्रामीं राहाणार। गोविंद मोहिते भक्त थोर॥
स्वामिकृपें कन्याकुमार। होऊन प्रपंच वाढला ॥१८॥

सुखवस्तु गृहस्थ होते। पैसा न पुरे संसारातें॥
सदा चिंता मानसीं वसते। गुरूला प्रार्थी काय करूं ॥१९॥

त्याचा शुद्ध भाव पाहून। श्रीगुरु सांगती वचन॥
शेतांत विहिर खणून। ऊसं हळद लावावी ॥२०॥

गोविंदा विचारी परत। प्रयत्न जाहले बहुत॥
शेतांत पाणी न मिळत। कुठें खणावें सांगावें ॥२१॥

स्वामिसमर्थ सांगती खुणा। पंचवीस हात वापी खणा॥
आनंद मोहित्यांचे मना। विहिर खणूं लागले ॥२२॥

पंचवीस हात खोदिलें। परंतु पाणी न लागलें॥
लोकांनीं त्याला उपहासिलें। तो म्हणे गुरुबोल सत्य ॥२३॥

येऊन गुरुपदीं परत। सांगतां श्रीगुरु सस्मित॥
खेद चिंता नको म्हणत। मोहितेमन संतोषले ॥२४॥

कृष्ण हत्तीचें फोडा शीर। मग धो धो वाहील नीर॥
शिष्य सांगती अर्थ सत्वर। काळा पाषाण फोडावा ॥२५॥

काळा पाषाण विहिरींत। न फोडतां खाली खणत ॥
काळा धोंडा फोडितां त्वरित। झरा उत्तम लागला ॥२६॥

दुष्टांची तोंडें बंद पडली। म्हणती सत्य गुरुमाऊली ॥
मोहित्यांनी वापी उजवली। आनंदें निघाले प्रज्ञापुरा ॥२७॥

गुरुपदीं उदक घालून। गुरुचरण तीर्थ घेऊन ॥
आपल्या विहिरींत घालून। शांति समाधान मिळविलें ॥२८॥

विहिरीचें उत्तम पाणी। श्रीगुरूची मधुर वाणी ॥
श्रीगुरूची भक्ति करूनी। येथें सौख्य अंतीं गती ॥२९॥

मुंबई ठाणें या बाजूचा। लक्ष्मण कोळी सद्भक्त साचा ॥
जहाजांतून व्यापार त्याचा। एकदां समुद्रीं वादळ ॥३०॥

त्याचें जहाज बुडूं लागले। धैर्य सर्व खलास झालें ॥
डोळ्यांतून गळूं लागले। अश्रुपाणी खळखळ ॥३१॥

एकाएकीं स्मरण झालें। चित्तीं वंदी गुरुपाउलें ॥
धांवा धांवा शब्द फुटले। श्रीगुरु द्रवले प्रज्ञापुरीं ॥३२॥

भक्त चोळाप्पाचे घरांत। तेव्हां स्वामिसमर्थ खेळत ॥
उभे राहून खालीं हात। करून हुं हुं हूं म्हणती ॥३३॥

लक्ष्मण कोळी आनंदला। तुफानांतून बचावला ॥
दर्या शांत होऊं लागला। आला बंदरीं सुखरूप ॥३४॥

इकडे अक्कलकोटातं। समर्थांचा उजवा हात ॥
एक घटका पाझरत। खारें पाणी गळतसे ॥३५॥

आठ दिवसांनी कोळी येत। घाली साष्टांग दंडवत ॥
डोळ्यांतून जल पाझरत। भक्त गुरूचा धन्य असे ॥३६॥

श्रीगुरु समर्था दयाघना। आपणां आली माझी करुणा ॥
प्रार्थून अर्पी गुरुचरणा। अलंकार वस्त्रें शत रुपये ॥३७॥

सांगे सकळ इत्यंभूत। तेव्हा लोकां कल्पना येत ॥
एक घटका गुरूचा हात। कां गळतसे क्षारोदकें ॥३८॥



गुरुपूजा विप्रभोजन। गुरुउच्छिष्ट प्रसादसेवन ॥
करून आनंदे कोळीमन। लक्ष्मण मंडळी सुखावली ॥३९॥

श्रीगुरुराया तुला नमन। संकटी तारितां भक्तजन ॥
तुझ्यापदी मनापासून। निष्ठा श्रद्धा प्रेमें असो ॥४०॥

एकदां पाऊस न पडत। स्वामि अनुष्ठान सांगत ॥
जपा भावें पर्जन्यसूक्त। रेणुका सहस्त्र नामही ॥४१॥

मग पाऊस पडे चांगला। कधीं करिती श्रीगुरुलीला ॥
देवतांवर टाकून धान्याला। पर्जन्य उत्तम पाडिती ॥४२॥

श्रीगुरु मेण्यांतून जात। संगे एकदां लोक बहुत ॥
मार्गात नदी आड येत। तुडुंब पूर दिसतसे ॥४३॥

समर्थ म्हणती पुढे चला। कां हो भीतसां या पुराला ॥
लोकांना विश्वास वाटला। चालूं लागले नदीमधें ॥४४॥

कांहीस पाणी छातीभर। कांहीस पाणी मांडीवर ॥
लोक गांठती पैलतीर। मेण्यास पाणी न लागलें ॥४५॥

गुरुवचन लोकां तारी। देव तारी त्या कोणी न मारी ॥
एका गांवीं वैष्णव अंतरीं। म्हणती भ्रष्ट हे यती ॥४६॥

करूं प्रश्न गहन थोर। अर्धा मनीं अर्धा बाहेर ॥
जर हे ईश्वरी अवतार। तर सांगती सत्य खरें ॥४७॥

गुरु जाणती हा विचार। त्यांनीं विचारण्या अगोदर ॥
समर्थ सांगती उत्तर। वैष्णव तेव्हा लाजले ॥४८॥

श्रीगुरूला भावें नमिती। मनोभावें करिती स्तुती ॥
एकदां दुसऱ्या गांवी यती। असतां पाऊस येतसे ॥४९॥

खूप लोक होते जमले। स्वामि समर्थ त्यांना म्हणाले ॥
पर्जन्यास सांगा सगळे। यावेळी येथे पडूं नको ॥५०॥

मग तसें लोक सांगती। पाऊस पडे सभोंवती ॥
परंतु जेथे ते असती। तेथेंच पाऊस गळेना ॥५१॥



प्रत्यक्ष दत्ताचा अवतार। संपूर्ण सत्ता सृष्टीवर ॥
त्यांना करुया नमस्कार। सांगुया गर्व देऊं नको ॥५२॥

पुष्कळ भक्तां गाणगापुरीं। दृष्टांत देती नरहरी ॥
प्रत्यक्ष आम्हीच प्रज्ञापुरी। राहिलों जाणा निश्चित ॥५३॥

दुसऱ्याही विविध क्षेत्रीं। भक्तां दृष्टांत सदा होती ॥
अक्कलकोटीं दत्त वसती। शंका कोणी घेऊं नये ॥५४॥

ब्रह्मनिष्ठ वामनबुवा। त्यांना दत्तदृष्टांत बरवा ॥
वसतो अक्कलकोट गांवा। दर्शना यावें कृपा असे ॥५५॥

वामन भक्तिभावें येत। गुरु अन्य गांवीं फिरत ॥
तिकडे जातां गुरु म्हणत। दृष्टांत आम्हीच दिला असे ॥५६॥

स्वामि देती मंत्रोपदेश। वामन पावती संतोष ॥
तुटला त्यांचा मायापाश। सशिष्य गुरूला नमन असो ॥५७॥

हेच श्रीगुरुलीलामृत। स्वामिरायांचें चरित्र लिहीत ॥
इतरही भक्त लिहीत। त्यांना नमन माझें असो ॥५८॥

मल्लिकार्जुन या नावाचा। जंगम भक्त श्रीगुरूचा ॥
मूळचा अथणी गांवचा। मग राहिला बारशीस ॥५९॥

त्याची मुलगी गर्भवती। तीन वर्षे कष्टत होती ॥
एकदां श्रीगुरु सांगती। गर्भ वाढेल चिंता नको ॥६०॥

त्याप्रमाणे अनुभव आला। स्वामीची किर्ती गातसे लीला ॥
लोकांस तो देऊं लागला। अंगारा स्वामि समर्थांचा ॥६१॥

लोकांना गूणही येतसे। नवस द्रव्य जमवीतसे ॥
श्रावणमासीं घालीतसे। जंगमां भोजन द्रव्यांचें ॥६२॥

त्यावेळी तेथे दत्तावधूत। सात दिवस प्रेमें जेवीत ॥
प्रज्ञापुरीं राजवाड्यांत। गुरु असती न जेविती ॥६३॥

राजादि कारण विचारिती। श्रीगुरु आनंदें सांगती ॥
बारशीस भोजनें होती। नृपेंद्र बातमी आणवी ॥६४॥

बारशीस दिवस सात। असती श्रीगुरुदेवदत्त ॥
सर्वही आश्चर्यचकित। नम्र होती श्रीचरणीं ॥६५॥

अक्कलकोटा सदा येती। नाना स्थानचे भक्त अती ॥
वाटेत गावी कधीं राहाती। तेथील एक दुष्ट नर ॥६६॥

त्यांची कांहीं सोय न करी। ताडन करी दुरुत्तरी ॥
लोकांचा विश्वास गुरूवरी। म्हणती कांहीं चिंता नसे ॥६७॥

मग एकदां गुरुचरणीं। तोही येतसे शरण मनीं ॥
गुरु सांगती समजावोनी। पहावी सोय अडल्याची ॥६८॥

श्रीगुरुदेव सर्वत्र वसे। यात्रेकरूंना सोय गवसे ॥
तीही गुरुची सेवा असे। दुष्ट पस्तावे, सुधारला ॥६९॥

अक्कलकोटी उत्सव होत। एकदां गौळी जलमिश्रित ॥
दूध देऊन मोलही घेत। दुप्पट पैसे गर्व मनीं ॥७०॥

त्याच्या पंधरा वीस म्हशी। दूध न देती त्यावेळेसी ॥
हातही लावण्या स्तनांसी। न देती त्या सर्वही ॥७१॥

तरी कांहीं धार काढिली। ती रक्ताची असे सगळी ॥
नाना उपाय करी गौळी। परंतु नाहीं उपयोग ॥७२॥

मग आला भावें शरण। म्हणे अशुद्ध अंत:करण ॥
करूं नका चित्त कठीण। श्रीगुरु आशीर्वाद देती ॥७३॥

अंगारां व तीर्थ घेऊन। म्हशींच्या स्तनांस लावून ॥
दूध काढी पूर्वीसमान। स्वामीस सेवा-दूध देई ॥७४॥

ज्याला जें जें शक्य असत। तें तें करावें भावें सतत ॥
श्रीगुरुपदीं ठेवून चित्त। सौख्य लाभतें इहपर ॥७५॥

चोळाप्पाचा कृष्णाप्पा सुत। महामारीनें झाला मृत ॥
आकांत होतसे बहुत। श्रीगुरु प्रेमें सांगती ॥७६॥

अहो मूर्ख रडतां काय। याचें होणार लग्न कार्य ॥
ऊठरे बाळा शब्दद्वय। आम्हाशी बोल यावेळीं ॥७७॥



हें स्वामि-वचन ऐकून। झालें कृष्णाप्पाचें संजीवन ॥
पुढे लग्न-कार्य होऊं। सुखी संसार पुत्र कन्या ॥७८॥

समर्थांची कृपा असत। त्याला नीलकंठ म्हणत ॥
एकदां श्रीसमर्थ जात। सद्भक्त-प्रेमें सोलापुरीं ॥७९॥

नरनारी दर्शन घेत। सर्वांना आनंद अत्यंत ॥
संसारीं सुख व्हावया प्राप्त। श्रीगुरुकृपा पाहिजे ॥८०॥

त्यावेळीं तेथील जंगम। सावकार नष्ट परम ॥
चनबसाप्पा त्याचें नाम। निंदा करी श्रीगुरूची ॥८१॥

परंतु घेतसे दर्शन। श्रीगुरु रूप पालटून ॥
दिसले सर्व शिष्यगण। उमामहेश्वर पंचमुखी ॥८२॥

जंगमाची झाली फजिती। मनोभावानें केली स्तुती ॥
दत्तावधूत स्वामि दिसती। करिती कृपा त्याचेवरी ॥८३॥

जंगम बनला गुरुभक्त। होतसे श्रीगुरुकृपें सुत ॥
सामदामादि मार्ग असत। तसे वागती दत्तगुरु ॥८४॥

कर्तिकस्वामीचें दर्शन। श्रीराम वा कृष्ण दर्शन ॥
देवीरूप वा इष्ट दर्शन। भक्तभावासमान मिळे ॥८५॥

गुरु नृसिंह सरस्वती। भक्तही हवा तो वेष देती ॥
श्रीगुरुरूपीं सर्व विभूती। त्यांना नमस्कार असो ॥८६॥

हवें तें दर्शन होतसे। भक्त वासना पुरतसे ॥
सन्मार्ग-निष्ठा रहातसे। कळतसे देव मायबाप ॥८७॥

ब्रह्मनिष्ठ वामन बुवा। एकदां गेले विठ्ठल गांवा ॥
जाऊन पहाती श्रीदेवा। पंढरपुरीं देवळांत ॥८८॥

विठोबा नाहीं विटेवर। दिसती तेथें गुरुवर ॥
मग विठ्ठल विटेवर। दिसती भक्ता वामना ॥८९॥

सप्तश्रृंगीस देवी असत। वामन भक्ता प्रसाद देत ॥
वामना प्रज्ञापुरीं पुसत। श्रीगुरु खुणा कृपेच्या ॥९०॥



सर्व स्वरूपी दिगंबर। त्यांना करूया नमस्कार ॥
श्रीगुरु नृसिंह यतिवर। प्रणवोच्चारी सर्वदा ॥९१॥

अनंतकोटी ब्रह्मांडनायक। त्यांची काया अवतारिक ॥
स्वभाव दावी अलौकिक । भक्तां तारक नेहमीं ॥९२॥

आधि व्याधि विरघळून। सुखरूप चाले जीवन ॥
श्रीगुरुपदीं भावें मन। ठेवितां जन्मसार्थक घडे ॥९३॥

बाळाप्पा भक्तास पुसती। आम्ही जाणार दूर अती ॥
येशील का आम्हां संगतीं। ब्रह्म-निर्वाण हें दिसे ॥९४॥

पांचशे वर्षे काया ठेविली। जगदुद्धारार्थ राबविली ॥
वैदिक धर्मास सांभाळी। त्यांना काळजी सर्वांची ॥९५॥

अक्कलकोट परिसर। क्षेत्रत्व पावे भाग्य थोर ॥
श्रीदत्तात्रेय अवतार। काया-रूपें वावरती ॥९६॥

सर्व प्राणिमात्रांचें हित। वैदिक संस्कृति दाखवीत ॥
हाच एक पंथ असत। दुसरा मार्ग कोठें नसे ॥९७॥

शरीराचे सर्व अवयव। तसेच सर्व जीव मानव ॥
मानवता हें धर्मास नांव। वैर कोणाचें नसावें ॥९८॥

श्रीदतात्रेय गुरुवर। दिसती आत्मानंदी अमर ॥
अनंत ब्रह्मांडी ऐक्य थोर। त्यांना नमस्कार असो ॥९९॥

सर्वांतर्यामी भगवान। श्रीदत्तगुरु दयाघन ॥
पंचाहत्तर अध्याय पूर्ण। अर्पितां घेतसे भक्तसुखा ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु

## अध्याय ७६ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:।।

श्रीगुरुराज सात्त्विक मूर्ती। शुद्ध भावें मनीं प्रकटती ॥
तिन्हीकाळचें सर्व जाणती। तारिती भक्तां सुकृपें ॥१॥

एका ब्राह्मण कुटुंबाप्रती। असे दत्त पूजनवृत्ती ॥
दोघे बंधू स्वतंत्र असती। परी भांडती नेहमीं ॥२॥

दोघेही झाले निर्धन। धाकटा करी दत्तपूजन ॥
मोठा करी गुरुसेवन। अक्कलकोटी श्रीचरणीं ॥३॥

एकदां त्यांसी गुरुवर। म्हणती देऊं काय वर ॥
वंदून मागे विप्र वर । दत्तपूजा मला मिळो ॥४॥

धाकटा सुपुत्र मरत। तर मला पूजा मिळत ॥
श्रीगुरु हंसून सांगत। तुलाच मृत्यु येणें बरे ॥५॥

दुसऱ्याचें अनिष्ट जाण। कधीं न चिंतावें आपण ॥
परंतु तसें न वदे ब्राह्मण। थोर संताप बंधूचा ॥६॥

कनिष्ठ सुपुत्र मरत। ज्येष्ठाकडे पूजन येत ॥
तोही मग सपुत्र मरत। धाकटा मुलगा पूजा करी ॥७॥

त्यानें धरिला शुद्ध भाव। अक्कलकोटा जाई सदैव ॥
जाणून त्याचा भक्तिभाव। श्रीगुरुकृपा होतसे ॥८॥

तामसीपणा करूं नये। श्रीगुरुभक्ति सोडूं नये ॥
अविचारानें वागू नये। सुविचार मनीं हवा ॥९॥

चांगल्याचें फळ चांगलें। वाईटास वाईट आलें ॥
आपण करावें सदा भलें। अनिष्ट दैव गुरु वारी ॥१०॥

आपण करतों हा विचार। मनांत असेल जोंवर ॥
उपदेश पाहिजे तोंवर। विधायक वृत्ति हवी ॥११॥

सर्व कांहीं देव घडवी। अशी वृत्ति झाली बरवी ॥
आपलें कर्तव्य संपवी। सुख दु:ख त्याला नसे ॥१२॥



असा मनुष्य द्वंद्वातीत। त्याला बोधाची गरज नसत ॥
आत्मानंदीं सदैव रत। त्यालाच शरण रिघावें ॥१३॥

स्वामि समर्थ सिद्धावधूत। जग ताराया अवतरत ॥
कर्दळीवनी होऊन गुप्त। पुन्हां प्रकट लोक कार्या ॥१४॥

सर्वांभूतीं परमेश्वर। ही भावना पाहिजे स्थिर ॥
मग वर्तन निरंतर। पूरक त्याला घडतसे ॥१५॥

सर्व गौण अन्य विचार। याला म्हणती जगदोद्धार ॥
शुद्ध आचार तसा विचार। मानवतेचा असावा ॥१६॥

हेंच संतांचें असे काम। असे भक्तकार्यकल्पद्रुम ॥
दत्त पुराण-पुरुषोत्तम। स्वामि समर्थ प्रज्ञापुरीं ॥१७॥

नानापरी लीला करीत। म्हणती व्हावें आतां गुप्त ॥
खऱ्या भक्तां सांगती मात। आतां सगुणरूप विसरा ॥१८॥

श्रीगुरु सांगती लोकांला। आयुष्य झालें चोळाप्पाला ॥
खरा भक्त आमुचा झाला। श्रीगुरुपदीं दृढभाव ॥१९॥

नंतर कांहीं दिवस गेले। श्रीगुरु फिरतीस निघाले ॥
अन्य मार्गे गमन झालें। भक्त चोळाप्पा नेतसे ॥२०॥

भवितव्यता ओळखून। श्रीगुरूंचे भरले नयन ॥
चोळाप्पा भक्त महान। होणार तशी त्यास बुद्धी ॥२१॥

देवी नवरात्र दिवस। एका गांवीं देवी स्थळास ॥
सर्व राहिले मुक्कामास। श्रीगुरु रक्षी भक्तांना ॥२२॥

देवी रूपही नृसिंहभान। श्रीगुरुनाथ कृपाघन ॥
परंतु नियतीचें चालन। मानिलें गुरुनाथांनीं ॥२३॥

मध्यरात्रीस पटकी भय। चोळाप्पाचा आयुष्य क्षय ॥
इतर सर्वही निर्भय। सकाळीं येती प्रज्ञापुरा ॥२४॥

गुरूपासून चोळाप्पा दूर। श्रीगुरुपदीं भाव स्थिर ॥
गुरुचरण तीर्थ थोर। अंतीं त्यास मिळतसे ॥२५॥



चोळाप्पाचें पूर्वपुण्य थोर। म्हणून भेटले गुरुवर ॥
पापी प्रारब्ध भोगी शरीर। चित्त गुरुपदीं लागलें ॥२६॥

स्वामि समर्थ मनीं उदेले। चोळाप्पाचे प्राण निघाले ॥
श्रीगुरुपदीं मोक्षा गेले। भक्ता आधार श्रीगुरूचा ॥२७॥

आश्विन शुद्ध नवमीस। दिवसा भक्त चोळाप्पास ॥
गुरुनाथ नेती मुक्तीस। स्वामि समर्था नमन असो ॥२८॥

काल प्राचीन अर्वाचीन। आधार एक भगवान ॥
सर्व स्वरूपी दयाघन। श्रीदत्त तारक सद्गुरु ॥२९॥

नृसिंहभान प्रज्ञापुरीं। वीस वर्षे राहिले पुरीं ॥
मग गुरु दत्तावतारी। चैत्रांत सोडिती कलेवर ॥३०॥

नश्वर शरीर दडवून। चैतन्य रूपें संजीवन ॥
लोकांच्या इच्छा पुरवून। तृप्त करिती गुरुनाथ ॥३१॥

श्रीपाद श्रीवल्लभ मूर्ती। तेच नृसिंह सरस्वती ॥
आजवरी कार्य करिती। आणि पुढेंही करणार ॥३२॥

सातशें वर्षे आजवरी। श्रीदत्तात्रेय अवतारी ॥
देती भक्तां विश्वास भारी। करिती रक्षण धर्माचें ॥३३॥

शुद्ध भावें होई शरण। त्याला श्रीगुरु त्वरें प्रसन्न ॥
आपले चरण स्थापून। स्थानें पुष्कळ निर्मिली ॥३४॥

केव्हां प्रकट केव्हां गुप्त। रहाती श्रीनृसिंह श्रीदत्त ॥
भक्त लोकां सुखी करीत। सुखें नेती आत्मसुखा ॥३५॥

नाना देवता जगीं असती। नाना पंथ जगीं दिसती ॥
परंतु सद्गुरु दत्तमूर्ती। सर्वां तारक नेहमी ॥३६॥

श्रीदत्तात्रेय गुरुवर। असती प्रेरणा करणार ॥
ग्रंथ श्रीदत्तचरित्रसार। विष्णुशरीर लिहीतसे ॥३७॥

श्रीदत्त लीला मनोहर। ऐकून वाचून सुंदर ॥
सौख्य पावोत नारीनर। सकळांसाठी ग्रंथ असे ॥३८॥

शके तेराशे आसपास। नरहरिजन्म कारंजास ॥
पांचशे वर्षे होत देहास। अक्कलकोटात विदेही ॥३९॥

शके सत्राशें नव्याण्णव। श्रीगुरु दाविती भावी भाव ॥
लीला करिती अभिनव। माघ कृष्ण द्वितीया तिथि ॥४०॥

प्रज्ञापुरीं बुधवारांत। जंगमांचे शिवायलांत ॥
बसून होते दत्तावधूत। नृसिंहतेज उग्र बहू ॥४१॥

जे पदार्थ आणिती जन। ते लिंगावर सर्व ठेवून ॥
होम करिती स्वाहा म्हणून। पदार्थ टाकिती अग्नीत ॥४२॥

फळे फुले तीळ तांदूळ। वस्त्र अलंकार तांबूल ॥
रुपये तूप पेढे सकळ। अग्निनारायण भक्षीतसे ॥४३॥

तो उग्र देखावा पाहून। दचकले सर्वही जन ॥
श्रीगुरूचें स्वाहा वचन। दावी खूण भक्तमना ॥४४॥

संध्याकाळपर्यंत चाललें। गर्भागार काळें पडलें ॥
दुसऱ्या दिनीं स्वच्छ दिसलें। पूर्वी समान सर्वही ॥४५॥

स्वामि समर्थ दाविती खूण। जरी सोडिली काया जाण ॥
तरी आहे पूर्वी प्रमाण। चिंता कांहीं न करावी ॥४६॥

सर्वही आश्चर्य चकित। होऊन झाले प्रेमळचित्त ॥
भावें नमस्कार करीत। भक्ति त्यांची गुरुचरणीं ॥४७॥

नंतर नृसिंह अवधूत। पूजारी सेवकां सहित ॥
प्रज्ञापुर-पंचक्रोशींत। फिरावयास निघाले ॥४८॥

तिकडे असती भक्तजन। त्यांना झालें गुरुदर्शन ॥
देवतांस गुप्त भेटून। सांगती स्थान प्रज्ञापुरीं ॥४९॥

शके अठराशे पूर्णात। बहुधान्य संवत्सरांत ॥
चैत्रमासी कृष्ण पक्षांत। प्रतिपदेस येती धीपुरीं ॥५०॥

नंतर चार दिवसांनी। ज्वर घेती श्रीगुरु मुनी ॥
अगाध स्वामींची करणी। लोकां सारखें वागती ॥५१॥



अक्कलकोटचे अधिकारी। आणि तेथील नरनारी ॥
सर्वांस काळजी लागे भारी। स्वामि समर्थतापाची ॥५२॥

सर्व येती श्रीगुरुपाशीं। सद्भावें नमिती समर्थांसी ॥
भरंवसा होता सर्वांसी। स्वामि समर्थ-पदांचा ॥५३॥

मीन राशीस ग्रहमंडळ। पहाती ज्योतिषी तयेवेळ ॥
कांहीं अनिष्ट ग्रह सबळ। त्यांचा परिहार चालविला ॥५४॥

जो ग्रहांना निर्माण करी। हवें ते हवें तेव्हां करी ॥
त्यासी ग्रहादि काय करी। सर्व सत्ता श्रीगुरूची ॥५५॥

ते रहाणार होते गुप्त। म्हणून देहा ज्वर आणीत ॥
तेथे कांहीं उपाय नसत। श्रीगुरु-भविष्य ठरलेले ॥५६॥

व्हावया भक्तांची समजूत। श्रीगुरु नृसिंहभान दत्त ॥
कृष्णाप्पाकडून करवीत। प्रायश्चित्त जप दानादि ॥५७॥

भक्त लोकां धीर नसत। परोपरीनें विनवीत ॥
न टाकावें एकच आर्त। सद्गद कंठ सकळांचा ॥५८॥

श्रीगुरु सर्वांस बोधिती। नानापरी समजाविती ॥
देह गुप्त करूं म्हणती। राहूं निश्चित प्रज्ञापुरीं ॥५९॥

कृष्ण त्रयोदशी संपत। चतुर्दशी असे मिळत ॥
मंगळवारीं देह ठेवीत। कन्या लग्न मीन राशी ॥६०॥

असे पूर्वीचें गुरुवचन। आपली अंत्य राशी मीन ॥
संध्याकाळीं महाप्रयाण। अवर्णनीय प्रसंग तो ॥६१॥

तेव्हां प्रेमें भक्त पुसती। काय सांगतां आम्हांप्रती ॥
गुरु गीतेचा श्लोक म्हणती। अनन्य भक्ताची चिंता मला ॥६२॥

अनन्यश्चिंतयन्तोमाम्। येजना:पर्युपासते ॥
तेषां नित्याभियुक्तानाम्। योग-क्षेमं वहाम्यहम् ॥६३॥

पंचप्राण एकवटून। ब्रह्मरंध्री मग नेऊन ॥
स्वामि निजानंदीं निमग्न। वटवृक्षा-खालीं ब्रह्ममय ॥६४॥



या स्थानीं आतां देवालय। तेथेंच स्वामि चैतन्यमय ॥
कण तीन पडले योगमय। दिव्य शरीर आनंदी ॥६५॥

लोकांनी बनविलें विमान। त्यांतून देह मिरवून ॥
ब्रह्मानंद गुहेंत स्थापन। जयजयकार सगद्गद ॥६६॥

गुहाद्वार बंद करून। पूजा आरति पूर्वी समान ॥
श्रीगुरुराया नित्य नमन। समर्था कृपा धरावी ॥६७॥

आम्हां न गवसे भक्तिज्ञान। तरी देवा कृपा करून ॥
घ्यावें प्रेमानें सुधारून। अखंड कृपा असावी ॥६८॥

नंतर चार दिवसांनी। भेटले श्रीसमर्थ मुनी ॥
शिष्य-भक्तांसह जाऊनी। नीलेगांवचे लोकांना ॥६९॥

त्यांना स्वामींचें आश्वासन। तसे भेटती पूर्वीसमान ॥
कळलें नव्हतें त्यांना अजून। स्वामींनीं समाधि घेतली ॥७०॥

अन्य ठिकाणींही अजून। स्वामि देती प्रत्यक्ष दर्शन ॥
आजगांवींही दर्शन-स्थान। श्रीगुरुकृपा धन्य असे ॥७१॥

वडाखालीं स्वामि-दर्शन। होतां मनाला समाधान ॥
बुधवार पेठेंत दत्तस्थान। दिसे समाधि चैतन्यमय ॥७२॥

देह गुहेंत, स्वामि-स्थान। वर दिव्यत्व भासमान ॥
चित्तवृत्ति होत तल्लीन। स्वामि-प्रेरणा स्पष्ट दिसे ॥७३॥

तीन वेळही आला प्रत्यय। तेथे समर्थ चैतन्यमय ॥
नृसिंहभान देती अभय। नमितां आत्मानंद मिळे ॥७४॥

सुभक्त बाळाप्पा मठांत। स्वामि समर्थ विलसत ॥
तेथे वंदिले दिव्य महंत। श्रीगजानन महाराज ॥७५॥

इतर स्थानेंही बहुत। सर्वा साष्टांग प्रणिपात ॥
भक्तोद्धार अखंड होत। शाश्वत दत्त अवतार ॥७६॥

श्रीगुर भक्तांचें पालन। करिती इहपर समाधान ॥
श्रीदत्तांच्या लीला गहन। मानव बने दत्तमय ॥७७॥

सर्वभूत-हित-चिंतून। करावें ग्रंथाचें वाचन ॥
श्रवण मनन निदिध्यासन। दावील कृपा श्रीगुरूची ॥७८॥

भूत प्रेत पिशाच्च बाधा। ग्रहादिक देवता बाधा ॥
दुष्ट करणी मांत्रिक बाधा। दृष्टिबाधा निरसतसे ॥७९॥

दुःख-दरिद्रादि आपदा। त्रिविध ताप न बाधती कदा ॥
त्रिविध सौख्य शुभ संपदा। ग्रंथ-श्रीगुरु देई कृपें ॥८०॥

सप्ताहाचें नित्य वाचन। एकादश अध्याय करून ॥
आहार विहार शुद्ध राखून। प्रदोष पारणा शुभतर ॥८१॥

भावें पाळावे यथाचार। ग्रंथ-वाचन निरंतर ॥
करितां सागती गुरुवर। तसें वागावें भक्तिरसें ॥८२॥

भक्ताला दत्तात्रेय दूर। कधींच नाहीं टाकणार ॥
श्रीदत्त सर्वही देणार। विधायक इच्छा जी असे ॥८३॥

दत्ताचे अंश-कलावतार। झाले, असती, असणार ॥
गृहस्थ, विरक्त, योगेश्वर। जगदुद्धार सदा करिती ॥८४॥

पंचमी गुरुवार दत्तयोग। असें मानिती महाभाग ॥
श्रीसत्यदत्तव्रत चांग। आंध्रभागीं रूढ असे ॥८५॥

श्रीवासुदेवानंद सरस्वती। त्यांचे शिष्य अच्युताश्रम यती ॥
मराठींत प्रकट करिती। हें व्रत भक्त-भाग्यानें ॥८६॥

श्रीसत्यदत्तलीला कथन। सूत शौनकादिकां करून ॥
सांगे असे हें व्यास वचन। श्रीलक्ष्मी नारायण संवाद ॥८७॥

नाना जन स्वकर्मी रत। क्लेश भोगिती अगणित ॥
ते कसे होती दुःख-मुक्त। उपाय सांगा सुखाचा ॥८८॥

असें रमा, माधवा पुसत। कृपें नारायण सांगत ॥
सत्यदत्त उत्तम व्रत। दुःख जाऊन सौख्य मिळे ॥८९॥

मोठे ऋषि नैमिषारण्यांत। शांत चित्तें हरि शाश्वत ॥
निर्गुण परब्रह्म ध्यात। आनंदानें डुलती ॥९०॥



सगुणरूपें कसें दर्शन। होईल असें चिंती मन ॥
इतक्यांत सगुण-दर्शन। घडे त्रिगुणी विश्वरूप ॥९१॥

ब्रह्मा उपेंद्र शिव एकत्र। त्रिकाळीं शाश्वत सर्वत्र ॥
विस्मयें प्रेम दाटे पवित्र। धन्य कृतार्थ सुदैवें ॥९२॥

घालिती साष्टांग प्रणिपात। सात्त्विक भाव उचंबळत ॥
यथाविधि पूजा करीत। संतुष्ट दत्त सांगती ॥९३॥

कृपा करावी तुमच्यावर। म्हणून पातलों पृथ्वीवर ॥
हा दत्तात्रेय अवतार। सर्वत्र गमन जाणावें ॥९४॥

विविध रूपें अगाध लीला। सूताकडून कळें तुम्हाला ॥
अत्युतम भोग सुखाला। प्राप्त व्हाल हो मत्कृपें ॥९५॥

होईल प्रसाद साक्षात्कार। माझ्या स्वरूपीं रहाल स्थिर ॥
सांगून दिव्य परमेश्वर। अंतर्धान पावतसे ॥९६॥

उत्सुकतेनें ऋषिजन। पुसती सूता दत्तवर्णन ॥
सूत आनंदें करी कथन। सर्वां नमन प्रेमभरें ॥९७॥

अत्रि अनसूया कांतेसह। जगच्चालक पुत्र इह ॥
व्हावा म्हणून सोडून गृह। कुल पर्वती तप करी ॥९८॥

प्रसन्न ब्रह्मा विष्णु शंकर। होती तीन देव कुमर ॥
चंद्र दत्त दुर्वास थोर। त्रिगुणी दत्ता नमन असो ॥९९॥

अध्यायपूर्ण शाहात्तर। अर्पितां प्रसन्न यतिवर ॥
श्रीदत्तात्रेय गुरुवर। घेती सप्रेमें भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय ७७ वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः। श्रीसद्‌गुरवे नमः॥

श्रीदत्तभक्त कृष्ण ब्राह्मण। वेदवेदांगशास्त्र संपन्न ॥
गोदातटाकीं नित्य राहून। ज्ञानप्राप्तर्थ प्रार्थीतसे ॥१॥

वैशाख वद्य पंचमीस। गुरुवारी रात्रीं चौथ्या घटीस ॥
दत्तदर्शनें कृष्ण विप्रास। परमानंद होतसे ॥२॥

घननीळ पीतवस्त्रधारी। शंखचक्र घे दोन्ही करीं ॥
उभयहस्तीं भक्तां तारी। अभय मुद्रा दाखवुनी ॥३॥

पाहून विस्मये हर्षनिर्भर। पुनः पुन्हां करी नमस्कार ॥
विधियुक्त सर्व उपचार। पक्वान्ने बहू खाद्य वस्तू ॥४॥

गव्हांचा रवा सवाशेर। तशींच केळीं तूप साखर ॥
सवाई मापानें गोक्षीर। वेलचीयुक्त नैवेद्य अर्पी ॥५॥

करी प्रार्थना दयासागरा। संसारसागर पैलतीरा ॥
घेऊन जावें परमेश्वरा। दत्तचरणां नमीतसे ॥६॥

विधिसमान विप्रपूजन। दक्षिणेसह करी सन्मान ॥
श्रीदेवदत्त स्वरूपज्ञान। देतसे कृष्ण ब्राह्मणाला ॥७॥

त्रिकाळीं परब्रह्म शाश्वत। सत्य स्वरूपें अधिष्ठित ॥
उपासनेनें संतुष्ट दत्त। देती वरदान भक्ताला ॥८॥

नित्य लक्ष्मी नित्य मंगल। पुत्रपौत्रादि सौख्य सकळ ॥
दीर्घायुष्य ज्ञान विमल। वंशो वंशीं सत्य मिळे ॥९॥

अंतर्धान पावलें श्रीदत्त। श्रद्धाभक्तीनें सत्यदत्तव्रत ॥
नेहमींच करी कृष्णभक्त। पंचमी गुरुवारीं शुभतर ॥१०॥

गोदातीर पंचवटीत। केशव ब्राह्मण विख्यात ॥
भार्या सुशीला धर्मरत। पतिव्रता ती थोर असे ॥११॥

बहुपुत्र झाले न वांचत। परम दुःखी असतां येत ॥
गोदातटाकयात्रा करीत। एक ब्राह्मण त्यांचे घरीं ॥१२॥

आदरातिथ्य करी दंपती। यात्रेकरून संतुष्ट चित्तीं ॥
सांगे उपाय केशवाप्रती। सत्यदत्तव्रत करा ॥१३॥

व्रतप्रभावें वांचती सुत। मिळे संपत्ति सौख्य सतत ॥
वंशोवंशीं ऐश्वर्य प्राप्त। अंतीं मोक्ष लाभतसे ॥१४॥

नहुष आख्यान सांगे सूत। पुत्रप्रतापें आयु हर्षित ॥
सत्यदत्तप्रभाव अद्भुत। नहुष श्रेष्ठ भूप बने ॥१५॥

योग्य कालीं मुक्ति मिळत। दत्तकृपा वंशा असत ॥
सत्यदत्तव्रत पसरत। इहपर सौख्य होतसे ॥१६॥

पंचगंगा-कृष्णा संगम। अमरापूर क्षेत्र उत्तम ॥
तेथे वाणी सुकल नाम। दत्तपूजनीं सदा रत ॥१७॥

धरून भक्ति यथाशक्ति। विप्रपूजनें त्याला तृप्ति ॥
घरीं गरीब परिस्थिती। द्रवती दत्त भक्तावरी ॥१८॥

कोणी यात्रेकरून ब्राह्मण। ज्ञानें करी दत्तस्मरण ॥
करीत असतां तीर्थाटन। येतसे सुकल वैश्याघरी ॥१९॥

वैश्य करी आदरें नमन। कृपाळू विप्र करी कथन ॥
सत्य दत्त व्रत महान। करितां हेतु पुरतील ॥२०॥

विप्र अन्य तीर्था निघत। वैश्य करी सत्यदत्त व्रत ॥
भार्यापुत्रादिकांसहित। प्रसादग्रहण करीतसे ॥२१॥

दत्तगुरु प्रसन्न होत। भक्ता आशीर्वाद मिळत ॥
वाणी ज्ञानसंपन्न होत। सौख्य सर्वही भोगीतसे ॥२२॥

व्रतप्रभाव दिसे अमित। धन धान्य समृद्धि होत ॥
पुत्रपौत्रादि वंश वाढत। ज्ञातींत श्रेष्ठस्थान मिळे ॥२३॥

श्रद्धाभक्तियुक्त होऊन। वरचेवर व्रत करून ॥
अखंड सौख्य इथें भोगून। अंतीं मोक्षास जातसे ॥२४॥

वाण्याकडील व्रत पाहून। भक्तीनें तसें व्रत करून ॥
कांहीं शूद्र ऐश्वर्यवान। होऊन इष्ट हेतु पुरे ॥२५॥



रथकारादि अन्य जन। भक्तिभावें व्रत करून ॥
पावती सुख समाधान। श्रीदत्तकृपें अक्षय ॥२६॥

शुभपवित्र कृष्णा-तीर। नृसिंहवरदी औदुंबर ॥
त्याचेखाली दत्तमुनिवर। ब्रह्मानंदीं स्थित होते ॥२७॥

करून शुद्ध अंत:करण। त्यांना पाहावया ब्राह्मण ॥
येतां घालिती लोटांगण। करिती स्तुति नानापरीं ॥२८॥

तेथें केलें सत्यदत्तव्रत। मनोभावें प्रसाद घेत ॥
पूजा पहाण्या लोक बहुत। जमती त्यांना प्रसाद मिळे ॥२९॥

त्यांतील कामिकां इष्ट मिळत। मुमुक्षुनरां मोक्षप्राप्त ॥
ब्रह्मज्ञान जे जे इच्छित। त्यांना ज्ञानानंद मिळे ॥३०॥

रोगपीडितां आरोग्यप्राप्त। दरिद्री बनती श्रीमंत ॥
पिशाच्चबाधा ज्यांना असत। त्यांची बाधा नष्ट झाली ॥३१॥

वंध्या स्त्रियांना पुत्र होत। ज्यांना जी जी इच्छा असत ॥
ती ती त्यांची पुरे त्वरित। श्रीदत्तकृपा अतर्क्य ॥३२॥

जे कोणी अनादर करीत। प्रसादाशिवाय घरीं जात ॥
त्यांतील काही लंगडे होत। मुके आंधळे काहीजण ॥३३॥

कित्येकां उद्भवे पोटशूळ। कांहीं प्रेतवत केवळ ॥
अपराधासमान फल। दत्तमाया गहन असे ॥३४॥

अधम नर दु:ख भोगीत। आप्त इष्ट विचार करीत ॥
श्रीदत्त प्रसाद नाकारीत। हेंच कारण सत्य दिसे ॥३५॥

मग त्यांना घेऊन जात। औदुंबरमुळांत श्रीदत्त ॥
तेथे श्रीसत्यदत्तव्रत। करिती भावें यथाविधि ॥३६॥

आदरें प्रसाद घेऊन। दुसऱ्यांसही देत वांटून ॥
आनंदित सर्वांचे मन। श्रीदत्त प्रसन्न जाहले ॥३७॥

श्रीदत्तदेवा भावें प्रार्थिती। हे उन्मत्त प्रसाद त्यजिती ॥
त्यामुळें आतां दु:ख भोगिती। त्यांना क्षमा कृपेनें करा ॥३८॥



वारंवार प्रार्थना नमन। श्रीदत्त कृपें ते सुधारून ॥
लगेच पूर्ववत होऊन। सुखी झाले अधम ते ॥३९॥

या लोकींचीं सुखे भोगून। अंतीं दत्तपुरीं गमन ॥
श्रीदत्त दयाळु भगवान। कलियुगीं सत्वर फलप्रद ॥४०॥

श्रीविष्णु सत्यनारायण। चंडी विनायक पूजन ॥
त्यांचे ही पेक्षां श्रीभगवान। सत्यदत्तव्रत थोर ॥४१॥

त्यामुळें फलप्राप्ति त्वरित। असे सत्पुरुष म्हणत ॥
सर्वातर्यामी दत्त असत। त्यांना नमस्कार असो ॥४२॥

सत्यदत्तव्रत पूजन। सत्यदत्त कथा गहन ॥
अैकून शुद्ध होतसे मन। सौख्य लाभतें इहपर ॥४३॥

सूत म्हणे हो ऋषिजन। यथाशक्ति दत्तवर्णन ॥
केलें ते अैकिलें आपण। करा अनुग्रह माझ्यावर ॥४४॥

मुनी आनंदाने म्हणती। सत्यदत्त वासना पुरविती ॥
तारक सत्यदत्त जगती। ऐकून कृतकृत्य झालो ॥४५॥

नारायण रमेस म्हणती । सत्यदत्त गूढ असती ॥
उत्कृष्ट व्रत जाणून चित्तीं। इष्टफलद कथिलें तुला ॥४६॥

असें सांगून लक्ष्मीपती। आनंदांत निमग्न होती ॥
रमा म्हणे श्रीहरी प्रती। आनंदें झालें कृतकृत्य ॥४७॥

कमला कथी ऋषिवर्यास। व्रतप्रकाश जगन्मयास ॥
व्रत करून सुख सर्वास। लाभे तोषे विष्णुभार्या ॥४८॥

श्रीपुराण समुच्चयांत। सारोद्धारीं संवाद असत ॥
श्रीलक्ष्मीनारायण करीत। तोच हा सत्यदत्तमहिमा ॥४९॥

व्यास सांगती कृपा सागर। श्रीसत्त्यदत्त प्रभुवर ॥
अनंतगुणी दयाळु थोर। अमृत दृष्टि जगावरी ॥५०॥

त्यामुळे जगाचें कल्याण। होवो सुखी जग संपूर्ण ॥
असे सर्वांस भक्तिपूर्ण। माझा साष्टांग नमस्कार ॥५१॥

गुरुवार पंचमी दिवस। पूजनीं असावा भक्तिरस ॥
श्रीसत्यदत्त सकळांस। कृपा दावील आपुली ॥५२॥

दुसऱ्या दिवशीं सांगता। जेव्हा उपजेल भक्ति चित्ता ॥
त्यावेळींही करावें व्रता। श्रीदत्तकृपा करितील ॥५३॥

श्रीदत्तप्रेरणा असत। त्यामुळे ग्रंथलेखन होत ॥
सर्वा प्रेमें पाळिती दत्त। त्यांना नमस्कार असो ॥५४॥

श्रीसत्यव्रतव्रत कथापान। करून सुख समाधान ॥
सद्भावना मनीं ठेवून। ग्रंथ आदरें लक्षावा ॥५५॥

विधायक इच्छा पुरती। पुण्यपापें जन्माची गती ॥
तशीच होतसे फलप्राप्ती। परंतु तारक दत्तगुरू ॥५६॥

श्रीनृसिंहयति दत्तावतारी। म्हणती अमृतघट स्वीकारी ॥
श्रीदत्तचरित्रसार करीं। त्यानींच लिहविला हा ग्रंथ ॥५७॥

वय अठ्ठावन्न वर्षात। त्रैमूर्ती भगवान श्रीदत्त ॥
स्वप्नी कृपा-ग्रंथ दावीत। हा श्रीदत्तचरित्रसार ॥५८॥

नंतर आरंभ दिवाळीस। श्रीदत्तजयंति साठ वर्षात ॥
नव आठ आठ एक शकास। शनिवारी ग्रंथ दत्तार्पण ॥५९॥

सत्याहात्तर अध्याय यांत। श्रीसद्गुरु आत्रेय दत्त ॥
प्रसन्नवदनें लिहवीत। त्यांना नमस्कार असो ॥६०॥

ग्रहयज्ञासह साठी शांती। श्रीगुरुचरित्र-सप्ताहपूर्ती ॥
श्रीदत्त सद्गुरु आश्वासिती। ग्रंथ कल्याण करील ॥६१॥

卐 卐 卐

रेवती द्वीप-परिसर। प्राचीन काळी सुखीं अपार ॥
आद्य ग्रामांत विप्रवर। वसती चौदाही गोत्रांचे ॥६२॥

नातू आमुचें उपनांव। मुख्यत: बागायती गांव ॥
मुखांत वेदमत्र सदैव। सर्व ब्राह्मणां नमस्कार ॥६३॥



ढाकोरें मळेवाड वहाळ। एक होती समुद्राजवळ ॥
भरती-ओहोटीचे जल। वाढे उतरे दोघांतही ॥६४॥

जहाजे रेवती बंदरांतून। दोन्ही खाडींत माल आणून ॥
पुरविती अंतर्भागामधून। व्यापार-पेठा दोन्हीकडे ॥६५॥

आजगांवीं खालचा मळा। तिकडे व्यापार त्यावेळां ॥
उत्तरे कोळी वसति-स्थळा। मग भट्टवाडी जाहली ॥६६॥

मळेवाडीस बळराम। ढाकोऱ्यांत पुरुषोत्तम ॥
आदि देव मुख्य परम। लक्ष्मी-नारायण म्हणती ॥६७॥

धामापूरची भगवती। तिकडे पूर्वी आमुची वस्ती ॥
तळ्यांत गेली प्राचीन वस्ती। भगवती कुलदेवी असे ॥६८॥

सावंतवाडी तालुक्यांत। आद्यग्राम आजगांवांत ॥
नातूपूर्वजा प्रसन्न होत। श्रीदेवगंगा रामेश्वर ॥६९॥

आजगांवीं पेठभागात। स्वयंभू शंकर प्रकटत ॥
समुद्रांतून भक्त आणीत। आदित्यनाथ आजगांवी ॥७०॥

सहाशें वर्षांपूर्वी सुमारें। यावनी सत्तेचे येत वारे ॥
त्यावेळी देवता गुप्त त्वरें। करिती लोक भक्तिभावे ॥७१॥

नंतर काळ निवळला। बेहेरे भक्ता दृष्टांत झाला ॥
देवी सांगे आपुल्या स्थळा। स्थापना करवी कृपेनें ॥७२॥

बेहेरे विप्र महाजन। वाकाडवाडा देवी स्थान ॥
श्रीरवळनाथ कृपाघन। पूर्वी-रवळनाथ जोडी असे ॥७३॥

रेवती पत्तन भागांतून। अगमनाथ साधु महान ॥
श्रीप्रसाद-मूर्ति झोळींतून। आणी रवळनाथाची ॥७४॥

अग्नि-वेताळ येथें स्थान। त्याला जागा दूर देऊन ॥
श्रीरुद्र-वेताळ-स्थापन। सदा रक्षण गांवा करी ॥७५॥

श्रीवेतोबा देवालयांत। सीता राम लक्ष्मण चैत्रांत ॥
जवळ स्वतंत्र मंदिरांत। पूर्वी-भूमिका सातेरी ॥७६॥

श्री दत्तचरित्रसार अध्याय ७७ वा

भट्टवाडींत गाडगीळ। अग्निहोत्री विप्र निर्मळ ॥
सावंत भोसले भूपाल। देती गोधना गायरान ॥७७॥

गाडगीळ पंत गणवर। राज-पूजित निरंतर ॥
आपटे मराठे विघ्नहर। स्वामिसमर्थ अगमनाथीं ॥७८॥

बुंदी-कोटा राजस्थान। तेथून नाटेकर ब्राह्मण ॥
आजगांवीं येऊन स्थापन। करिती भार्गवराम-विष्णू ॥७९॥

नृसिंहवाडीस दृष्टांत। मग काकतकर स्थापित ॥
श्रीदत्त-पादुका ढाकोऱ्यांत। भराडी भावय प्राचीन ॥८०॥

राष्टोळी ब्राह्मण बहुत। चौंडेश्वरी शिवाचे पुढ्यांत ॥
पावणादेवी ढांकोऱ्यांत। दांडेकर पुरमार चवाठे ॥८१॥

श्रीरवळनाथ तीन गांव। क्षेत्रपाल कालभैरव ॥
होलिका यक्ष रक्षक सर्व। वंदितों सकळां निष्ठेने ॥८२॥

गृहस्थाश्रमी नरांप्रत। कुलाचारादि अवश्य असत ॥
सर्वस्थित दत्तावधूत। नाना रूपांनीं कृपा करो ॥८३॥

गोपाळ दिवाकर नातू पिता। बेहेरे कृष्णाजी आऊ दुहिता ॥
राधा-गोपाळ माता पिता। आई आप्पांस नमस्कार ॥८४॥

यमुना विश्वनाथ मराठे। दुर्गा रामचंद्र आपटे ॥
अनंत विष्णु बंधु धाकटे। गोपाळ राम प्रिय मामा ॥८५॥

भगिनी दोन बंधू एक। उभयपक्षी पूर्वज कैक ॥
स्नेही इष्ट उपकारिक। आप्तादि सर्वां नमस्कार ॥८६॥

सासरे शिवभक्त पुरोहित। आपटे नारायण अनंत ॥
आजगांव धारगळ बांद्यांत। सटींत प्रियवटाश्वत्थ ॥८७॥

बोरी शिरोडें गोमांतकांत। कामाक्षी देवीचे सुभक्त ॥
फडके-दुहिता गंगा बनत। नारायण-पत्नी भागीरथी ॥८८॥

सासूश्वशुर सर्वां नमन। अनंत आचार्यांस वंदन ॥
पिता गोपाळ गुरूंस नमन। ज्योतिर्वैद्यकही ते देती ॥८९॥

श्री दत्तचरित्रसार अध्याय ७७ वा

तुळशीचे गोरे उपनामक। दत्तात्रेय-पुत्र विनायक ॥
औदुंबर दत्त-उपासक। वैदिक तपस्वी प्रेमें नमूं ॥९०॥

शक अठराशें एकूणतीस। पौष शुद्ध तृतीया जन्मास ॥
सोमवर धनिष्ठा कुंभरास। वृषभलग्न उच्च गुरू ॥९१॥

स्वगृहीं जन्म ढाकोऱ्यांत। मग रानडे-भूमींत येत ॥
वेतोबापुढें प्रभुभूमींत। ग्रंथ-लेखन झालेंसे ॥९२॥

शिक्षित अध्यापक-व्यवसाय। सेवानिवृत्त छपन्न वय ॥
बालपणापासून उदय। मनीं देव संत साधू ॥९३॥

पंचायतन-पूजा चालत। त्यांचें दर्शन गाणगापुरांत ॥
पादुका आत्मलिंग दत्त देत। भागीरथी-भीमा संगमीं ॥९४॥

रात्रीं तृतीय प्रहरांत। सस्मित त्रैमूर्ति प्रकाशन ॥
तुझें काम झालें म्हणत। श्रीदत्त गुरूला नमस्कार ॥९५॥

श्रीगीतार्थप्रकाश ग्रंथ। दत्तस्तोत्रादिक हा ग्रंथ ॥
लिहिविती श्रीगुरु समर्थ। दत्त-प्रेरणा भावें कळे ॥९६॥

लग्न झालें धारगळींत। कृष्णा-वधू सीता बनत ॥
पद्मा-कमलामधील सुत। गोविंद व्यंकट-गिरि-स्मृति ॥९७॥

माउली धारेश्वर धारगळ। श्रीशांतादुर्गा माता कृपाळ ॥
रेडी अरविंद माता वत्सल। सोनुली मोरुडें माता नमूं ॥९८॥

आंबोस वांदिवडें ब्राह्मण। दिव्य आवेश देहावरण ॥
सदत्त चरणीं लोटांगण। कुलदेवता पुरुषां नमूं ॥९९॥

आजगांवच्या सर्व देवता। परिचित साधुसंत देवता ॥
दयाळु श्रीगुरु देवदत्ता। भावें सर्वात्मका नमूं ॥१००॥

श्रीदत्तचरित्रसार ग्रंथ। पूर्ण करील मनोरथ ॥
श्रीदत्त-सद्गुरु समर्थ। स्वीकारी ग्रंथ भक्तहिता ॥१०१॥

श्रीदत्तात्रेय दयाघन। श्रीपाद श्रीवल्लभ भगवान ॥
प्रेमळ श्रीगुरु नृसिंहभान। माणिक दत्ता नमन असो ॥१०२॥



या ग्रंथामधील आशय। मंगलाचरण प्रथमाध्याय ॥
जन्मकथा श्रीदत्तात्रेय। अवधूत-भेट प्रल्हादा ॥१०३॥

श्रीविष्णु अवतार प्रसंग। विष्णुदत्त भाव अभंग ॥
आयु यदु अलर्क असंग। एकवीर एकावली ॥१०४॥

सहस्रार्जुन भार्गवराम। दाशरथि श्री राजाराम ॥
कृष्ण भगवंत पुरुषोत्तम। नवयोगेश्वर नाथ नव ॥१०५॥

श्रीवासुदेवानंद सरस्वती। नर्मदातीरीं देह त्यजिती ॥
भारती वैदिकधर्म महती। श्रीपाद कीर्ति विलसतसे ॥१०६॥

श्रीनरसिंह सरस्वती। पांचशें वर्षे काया फिरती ॥
प्रज्ञापुरीं काया ठेविती। तरीही अखंड भक्तां कृपा ॥१०७॥

श्रीमाणिक सद्गुरु दत्त। अनंतलीला वृत्ति शांत ॥
सकलमतें एक मार्गात। यति होऊन समाधि ॥१०८॥

भूगोल-भाग्य वेदधर्म। त्यासाठींच श्रीदत्त-जन्म ॥
एकच मार्ग आत्माराम । दत्तपंथ प्रसिद्ध असे ॥१०९॥

श्रीपाद श्रीनृसिंहदत्त। प्रतिकूल काला ढळवीत ॥
श्रीमाणिक प्रभुराजदत्त। सर्व एकच त्यांना नमूं ॥११०॥

तामस बौद्धिक संस्कृति। मानवां हवीच श्रद्धाभक्ति ॥
संसार करून अनासक्ति। परिणति मोक्षप्राप्तींत ॥१११॥

जग जेथून विस्तारिलें। तेथें त्याचें मूळ सगळें ॥
तें जाणून घेतां पाहिलें। भिन्नधर्मही एक मार्गी ॥११२॥

दत्तगुरु दत्तावतार। त्रिकाळीं जगा तारणार ॥
जरी कालचक्र भयंकर। तरीही तारक दत्तगुरू ॥११३॥

भक्तां सदा ते सांभाळिती। निष्ठेनें मिळतसे प्रचीती ॥
दत्तावधूत प्रसन्नमूर्ती। रक्षिती जगास प्रेमानें ॥११४॥

दत्ता तुझे चरित्रगहन। कसें जाणील मानवी मन ॥
परंतु तव आशीर्वचन। अमर सोपान सत्य असे ॥११५॥



तुझें चरित्र आठवावें। प्रेमळ भावें मनीं ठसावें ॥
तव लीलेंत मन रंगावें। हेंच सार्थक जन्माचें ॥११६॥

साधव चारही पुरुषार्थ। हाच स्वार्थ व परमार्थ ॥
तव चरण करोत कृतार्थ। मन स्थिरावो तुझ्या पदीं ॥११७॥

जातिपंथधर्मातीत। तूंच तारक भगवंत ॥
तुझ्या चरणीं रहावें चित्त। हेंच मागणें पुरवावें ॥११८॥

त्रिविध ताप जगीं असती। ते निवारी तुझीच प्रीती ॥
सुखानें व्हावी सुखप्राप्ती। लिहितां स्वस्ति दत्त-वाणी ॥११९॥

हस्तमुद्रिके नको दृष्टांत। तरती भावें जन समस्त ॥
जे नरयोनीविरहित। तेही तरती दत्तकृपे ॥१२०॥

शतओव्यांचे शाहात्तर अध्याय। अेकशें अेकवीस ओवीमय ॥
सत्याहात्तरावा शिखराध्याय। ग्रंथ दिसला दत्तहस्तीं ॥१२१॥

इति श्री सद्गुरुप्रेरणया नातु इत्युपनामक-
राधागोपाळसुत-विष्णुविरचित: प्रसादपूर्ण:
भवतापनिवारक: भुक्तिमुक्तिदायक: परिपूर्ण: अमृतघट:
श्रीदत्तचरित्रसारग्रंथ: संपूर्णोस्ति । स्वस्ति ।
ॐ तत्सद्ब्रह्मश्रीगुरु दत्तात्रेयर्पणमस्तु ॥



# आरती

कृष्णा पंचगंगा-संगम निजस्थान।
चरित्र दावुनी केलें गाणगापुरीं गमन ॥
तेथें भक्तश्रेष्ठ त्रिविक्रम यति जाण ॥
विश्वरूपें तया दिधलें दर्शन ॥१॥

जयदेव जयदेव जद सद्गुरु दत्ता
नरसिंह सरस्वते जय विश्वंभरिता
जयदेव जयदेव ॥ध्रु.॥

वंध्यासाठी वर्षे पुननिधान। मृत ब्राह्मण उठवीता।
वांझ महिषी काढवी दुग्ध दोहून। अंत्यजाचे मुखीं
निगमागम पूर्ण तीर्थ शिंपून ॥२॥ जयदेव जयदेव ॥

शुष्ककाष्ठीं पल्लव दावुनी लवलाहीं। कुष्ठी ब्राह्मण
केला शुद्ध निजदेहीं ॥
अभिनव महिमा त्याचा वर्णू मी कायी ।
म्लेंछ राजा येऊनी वंदी श्रीपायीं ॥३॥ जयदेव जयदेव

दिपवाळीचे दिवशीं भक्त येऊनी ॥
आठही जण मस्तक ठेविती श्रीचरणीं ॥
आठही ग्रामीं भिक्षा केली ते दिनीं ॥
निमिष मात्रें तंतुक नेला शिवस्थानी ॥४॥ जयदेव जयदेव

ऐसें चरित्र दावुनी जडमूढ उद्धरिले ॥
भक्तवत्सल अपलें ब्रीद मिरवीलें ॥
अगाध महिमा म्हणवुनी वेद श्रुति बोले ॥
गंगाधर-तनय वंदी पाऊले ॥५॥ जयदेव जयदेव

अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त स्वस्ति ! स्वस्ति ! स्वस्ति !!



# श्री दत्तप्रभु नमनावली

अत्र्यनुसूया दंपति तनया दत्तात्रेया नमो नमो ॥१॥
एकरूप शिवब्रह्मा विष्णु दत्तात्रेया नमो नमो ॥२॥
शंखचक्रयुक्त गदापद्मधर दतात्रेय नमो नमो ॥३॥
षड्भुजधारी त्रिअंबक श्री दत्तात्रेया नमो नमो ॥४॥
पायिं खडावा श्वानपरिवृता दत्तात्रेय नमो नमो ॥५॥
दंडकमंडलु कामधेनुयुत दत्तात्रेया नमो नमो ॥६॥
जटाधारी सिद्धिविभूषित दत्तात्रेय नमो नमो ॥७॥
त्रिशूल-डमरू व्याघ्रचर्मि श्री दत्तात्रेया नमो नमो ॥८॥
कंथाधारी भिक्षापात्री दत्तात्रेया नमो नमो ॥९॥
चतुर्विंशती गुरूपदिष्टा दत्तात्रेया नमो नमो ॥१०॥
अत्रिवरद, योगिराज, दिगंबर दत्तात्रेय नमो नमो ॥११॥
मायामुक्ता, मायायुक्ता, दतात्रेया नमो नमो ॥१२॥
कालाग्निशमन, ज्ञानसागरा दत्तात्रेय नमो नमो ॥१३॥
योगीजनवल्लभादि गुरु श्रीदत्तात्रेया नमो नमो ॥१४॥
सिद्धराज, शिवरूपरूपिणे दत्तात्रेया नमो नमो ॥१५॥
देवदेवा विश्वंभरा श्रीदत्तात्रेया नमो नमो ॥१६॥
कृष्णश्यामकमलनयना श्री दत्तात्रेया नमो नमो ॥१७॥
लीलाविश्वंभरावतारी दत्तात्रेया नमो नमो ॥१८॥
नारद तुंबरुगायनी स्तुत दत्तात्रेय नमो नमो ॥१९॥
परशुराम प्रल्हाद पूजिता दत्तात्रेया नमो नमो ॥२०॥
भार्गव सांकृत्यायूपदेशक दत्तात्रेया नमो नमो ॥२१॥
कार्तवीर्य सहस्त्रार्जुनेशा दत्तात्रेया नमो नमो ॥२२॥
यदुनवनाथा वरप्रदात्या दत्तात्रेया नमो नमो ॥२३॥
अलर्क जनार्दन एकनाथ गुरु दत्तात्रेया नमो नमो ॥२४॥
गाणगापुरगिरनारनिवासी दत्तात्रेया नमो नमो ॥२५॥
कृष्णा पंचगंगिं निमज्जी दत्तात्रेया नमो नमो ॥२६॥
कुरवपुर श्रीपादरूपिणे दत्तात्रेया नमो नमो ॥२७॥
स्मर्तृगामिने तस्करहंत्या दत्तात्रेया नमो नमो ॥२८॥



गोकर्णादि क्षेत्रान्वेषी दत्तात्रेया नमो नमो ॥२९॥
भिक्षाकरविरिं माहुरिं निद्रित दत्तात्रेया नमो नमो ॥३०॥
नरसिंह सरस्वति भीमामर्जिन् दत्तात्रेया नमो नमो ॥३१॥
वाडी औदुंबरस्थायिने दत्तात्रेया नमो नमो ॥३२॥
तीर्थोत्पादक वेदवानिता दत्तात्रेया नमो नमो ॥३३॥
शनिप्रदोष पूजनोपदेशक दत्तात्रेय नमो नमो ॥३४॥
शाक सेवुनी सुवर्णदात्या दत्तात्रेया नमो नमो ॥३५॥
पिशाचमोचक शूलनिवारक दत्तात्रेय नमो नमो ॥३६॥
देवी भुवनेश्वरी वनिता दत्तात्रेया नमो नमो ॥३७॥
देवि चंदलापरमेश्वरीस्तुत दत्तात्रेया नमो नमो ॥३८॥
वंध्यामहिषी दोहनकारक दत्तात्रेया नमो नमो ॥३९॥
वृद्धानारी संततिदायक दत्तात्रेया नमो नमो ॥४०॥
मृतसुतजीवक सतिपतितारक दत्तात्रेया नमो नमो ॥४१॥
शिवोपासक आयुर्वर्धक दत्तात्रेया नमो नमो ॥४२॥
नरहरिरूपा वशान्नपूर्णा दत्तात्रेया नमो नमो ॥४३॥
तंतुक शुद्रा वरप्रदाई दत्तात्रेया नमो नमो ॥४४॥
नंदी नरहरी काव्याकृष्टा दत्तात्रेया नमो नमो ॥४५॥
नागनाथ गुरु विरुपाक्षेशा दत्तात्रेया नमो नमो ॥४६॥
अनंतपूजा व्रतोपदेशक दत्तात्रेया नमो नमो ॥४७॥
यतयेदर्शित विश्वरूपिणे दत्तात्रेया नमो नमो ॥४८॥
वैजनाथ श्रीशैल्यगौप्यिने दत्तात्रेया नमो नमो ॥४९॥
स्वामी अक्कलकोटरूपिणे दत्तात्रेया नमो नमो ॥५०॥
दासो, टेंबे वासुदेव, स्तुत दत्तात्रेया नमो नमो ॥५१॥
माणिकप्रभु, मुक्तेश्वरादि स्तुत दत्तात्रेया नमो नमो ॥५२॥
बिडकर रामानंद पूजिता दत्तात्रेया नमो नमो ॥५३॥
निरंजन रघुनाथ वनिता दतात्रेया नमो नमो ॥५४॥
बोठे, दीक्षीत, मुनिस्वामि, स्तुत दत्तात्रेया नमो नमो ॥५५॥
देव मामलेदार पूजिता दत्तात्रेया नमो नमो ॥५६॥
बाळेकुंद्री पंत सद्गुरू दत्तात्रेया नमो नमो ॥५७॥
जालवण नारायणाचिंतश्री दत्तात्रेय नमो नमो ॥५८॥

केडगाव नारायण सेवित दत्तात्रेया नमो नमो ॥५९॥
साईशिरडी कृष्ण-स्वामिनत दत्तात्रेया नमो नमो ॥६०॥
स्वामी नारायणाख्य पूजित दत्तात्रेया नमो नमो ॥६१॥
अन्यैर्भक्तैरनंत पूजित दत्तात्रेया नमो नमो ॥६२॥
उत्पत्तिस्थितिलयाधिकारी दत्तात्रेया नमो नमो ॥६३॥
भयकृद् भयनाशका परेशा दत्तात्रेया नमो नमो ॥६४॥
ज्ञेयातीता ज्ञानानंदा दत्तात्रेय नमो नमो ॥६५॥
पूर्णानंदा पूर्णाकारा दत्तात्रेया नमो नमो ॥६६॥
जगदाधारा जगत्पोषका दत्तात्रेया नमो नमो ॥६७॥
जगत्पालका जगदोद्धरा दत्तात्रेया नमो नमो ॥६८॥
निराकारा ॐकारा श्री दत्तात्रेया नमो नमो ॥६९॥
सर्वज्ञा सर्वातर्यामी दत्तात्रेया नमो नमो ॥७०॥
दत्त दिंगबर विश्वनाथ श्री दत्तात्रेया नमो नमो ॥७१॥
भक्ता दत्ता भिक्षाग्राही दत्तात्रेया नमो नमो ॥७२॥
ब्रह्मचारि श्री जगद्गुरु प्रभु दत्तात्रेया नमो नमो ॥७३॥
घनानंद प्रज्ञानरूपिणे दत्तात्रेया नमो नमो ॥७४॥
यज्ञरूपही यज्ञीमोक्ता दत्तात्रेया नमो नमो ॥७५॥
अनंतकोटी ब्रह्मांडनायका दत्तात्रेया नमो नमो ॥७६॥
दशावतारी उपअवतारी दत्तात्रेया नमो नमो ॥७७॥
अनाद्यनंता अगोचरा श्री दत्तात्रेया नमो नमो ॥७८॥
बुद्धीदायक मतिप्रकाशक दत्तात्रेया नमो नमो ॥७९॥
चराचराखिल प्रेमस्वरूपा दत्तात्रेया नमो नमो ॥८०॥
भदेवाखिलवृंदपूजिता दत्तात्रेया नमो नमो ॥८१॥
तीर्थप्रकाशक योगिनीस्तुत दत्तात्रेया नमो नमो ॥८२॥
वर्णितब्राह्मण वर्णाचारा दत्तात्रेया नमो नमो ॥८३॥
संन्यासाश्रम रक्षणकर्त्या दत्तात्रेया नमो नमो ॥८४॥
तरुअश्वत्था पूजवि त्या गुरु दत्तात्रेया नमो नमो ॥८५॥
दिव्य मनोहर रूप धारिणे दत्तात्रेया नमो नमो ॥८६॥
गंध चंदनी भाळीं चर्चित दत्तात्रेया नमो नमो ॥८७॥
बळें भक्तगृहप्रवेशी दत्तात्रेया नमो नमो ॥८८॥



राज्य प्रदायक रजकास्वामी दत्तात्रेया नमो नमो ॥८९॥
दिपवालीदिनिं अष्टरूपिणे दत्तात्रेया नमो नमो ॥९०॥
गंगा गौतमि तीरविहारी दत्तात्रेया नमो नमो ॥९१॥
बहुविध गुरतम सेवापेक्षी दत्तात्रेया नमो नमो ॥९२॥
राजसरूपा योगिवरेण्या दत्तात्रेया नमो नमो ॥९३॥
श्री सुखदायक विघ्नविघातक दत्तात्रेया नमो नमो ॥९४॥
पादपद्म श्री सुरमुनिवंदित दत्तात्रेया नमो नमो ॥९५॥
दयार्द्र दृष्टीधारी श्रीगुरु दत्तात्रेया नमो नमो ॥९६॥
वदनि हास्यार्धोन्मीलनेक्षी दत्तात्रेया नमो नमो ॥९७॥
लग्नीं रूचिवैराग्यनारिं त्या दत्तात्रेया नमो नमो ॥९८॥
भव भयहारक भवाब्धितारक दत्तात्रेया नमो नमो ॥९९॥
दिनकर रजनीनाथ लोचना दत्तात्रेया नमो नमो ॥१००॥
गंगास्नाई स्वैरविहारी दत्तात्रेया नमो नमो ॥१०१॥
बहु कृपाळु भक्त्यातुष्टा दत्तात्रेया नमो नमो ॥१०२॥
राजस मंगल मलंगवेषी दत्तात्रेया नमो नमो ॥१०३॥
दिव्यांबरधर दिगंतकीर्ते दत्तात्रेया नमो नमो ॥१०४॥
गंगाधारी चरणीं गंगा दत्तात्रेया नमो नमो ॥१०५॥
बदरीवासी भुजंगधारी दत्तात्रेया नमो नमो ॥१०६॥
रागद्वेषाविरहितमूर्ते दत्तात्रेया नमो नमो ॥१०७॥
दिवारात्रिकर दिक्कालातित दत्तात्रेया नमो नमो ॥१०८॥
गंधमनोहर सुगंधयोगी दत्तात्रेया नमो नमो ॥१०९॥
बलिमदहारक बलवंता श्री दत्तात्रेया नमो नमो ॥११०॥
राक्षसांतका कर्पुरकांतिन् दत्तात्रेया नमो नमो ॥१११॥
श्रीपति श्रीधर श्रेयोमूर्ते दत्तात्रेया नमो नमो ॥११२॥
पाशविनाशक पापनिवारक दत्तात्रेया नमो नमो ॥११३॥
दक्षा रक्षणि निश्चित भक्ता दत्तात्रेया नमो नमो ॥११४॥
वर्ण सुवर्णावर्णातीता दत्तात्रेया नमो नमो ॥११५॥
लक्ष्य अलक्षा अवधूत निरंजन दत्तात्रेया नमो नमो ॥११६॥
भस्म विभूषित भक्तोद्धारा दत्तात्रेया नमो नमो ॥११७॥
दिनमणि शशी तेजोगोला दत्तात्रेया नमो नमो ॥११८॥



गंधर्वस्तुत रुद्राक्षप्रिय दत्तात्रेया नमो नमो ॥११९॥
बद्ध भक्तहृदि श्रीदुंबरप्रिय दत्तात्रेया नमो नमो ॥१२०॥
रागरागिणी नादब्रह्मा दत्तात्रेया नमो नमो ॥१२१॥
तवपदिं राधा-केशवसुत हा विश्वनाथ रे सदा रमो ॥१२२॥

## विनवणी

दिगंत कीर्ती दत्ता तुझी रे दिना उद्धरिसी ।
गंगा जमुना माझ्या परि कां नयनें वाहविसी ॥१॥
बरा कां न मी तुझ्या दृष्टिनें देवा परमेशा ।
राखिसि कां मग देवा मजला नसे जीविताशा ॥२॥
दिवारातिंही स्मरतो तुजला व्यर्थ काय सारें ।
गंध कृपेचा येना मुळि का अद्यापिहि बारे ॥३॥
बहू श्रमलो रें स्वार्थांकाजीं अहर्नीश दत्ता।
रागा मोहा कवटाळूनी विसरूनि तव सत्ता ॥४॥
श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि तारि तारि मजला ।
पायिं लागुनी तुझ्या दयाळा विनवी मी तुजला ॥५॥
दत्त दयाळा भक्त वत्सला बिरुदावलि तूझी ।
वदनी वदते सदैव देवा रसना रे माझी ॥६॥
लक्ष न लागे मन हें भ्रमते सदैव संसारी।
भक्ति तुझी मज होईनारे सायंदेवा परी ॥७॥
दिसे कठिणता उपासनी तव मला पामराला ।
गंगाधर सुत सरस्वतीच्या विसंबी शब्दाला ॥८॥
बद्धांजली मी ठेवुनि निष्ठा प्रभो तुझ्या पायीं।
राहे निश्चित तार मार वा जें इच्छे येई ॥९॥

**श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु**

## श्रीदत्तप्रभूची आरती

**(कवि - विश्वनाथ केशव कुलकर्णी हत्तरवाडकर, अॅडव्होकेट, बेळगांव)**

चतुरानन हरि हर आले, कपटानें धरणीं।
झाले परि दत्तात्रय, अनसूया चरणीं।
श्रीपाद श्रीवल्लभ तेची, कुरवपुरग्रामीं।
नरसिंह सरस्वति ही, अंबासुत स्वामी ॥१॥
जयदेव जयदेव जय जय गुरुराया। जय दत्तात्रया।
सानंदें ओवाळूं, सद्भावें ओवाळूं, आरति तव पाया।
जयदेव जयदेव ॥धृ.॥
औदुंबरी संध्या स्नाना सारोनी।
भीमामरजासंगमिं मग्न तपोध्यानीं।
वाडीं करविरिं करिशी, भिक्षा माध्यान्हीं।
माहुरक्षेत्रीं सारिशि, विश्रांती शयनीं ॥२॥
भक्तोद्धारासाठीं देवा, घेता अवतार।
नाना नामें रूपें, भुविं वारंवार।
ठेवुनि निष्ठा चरणीं, संसारीं घोर।
भाकी विश्वनाथ अभय निरंतर ॥३॥

ब्रह्मार्पण

बेळगांव, शनिवार, माघ. व. ४. शके १८८९, ता. २७-२-१९६८



## आरती दत्ताची

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा। त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा। नेति नेति शब्दे न ये अनुमाना। सुरवरमुनिजययोगि समाधी न ये ध्याना ॥१॥

जयदेव जयदेव जय श्रीगुरुदत्ता। आरती ओवाळितां हरली भवचिंता ॥धृ.॥ सबाह्य अभ्यंतरी तूं एक दत्त। अभाग्यासी कैची कळेल ही मात। पराहि परतली तेथे कैंचा हेत। जन्ममरणाचा पुरलासे अंत ॥२॥ ॥ जय. ॥

दत्तां येऊनिया उभा टाकला। सद्भावें साष्टांगें प्रणिपात केला। प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला। जन्म मरणाचा फेरा चुकविला ॥३॥ ॥जय.॥

'दत्त दत्त' ऐसे लागले ध्यान। हारपलें मन झालें उन्मन। मीं-तू पणाची झाली बोळवण। एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान ॥४॥ ॥जय.॥



## मनींचा भाव

परम पवित्र जगच्चालक श्रीदत्त महाराजांनी प्रेरणा करून, हा 'श्रीदत्तचरित्रसार' ग्रंथ लिहवून, सर्वजनांसाठी प्रसिद्ध करविलां; त्याची लीला कोण जाणणार आहे ! त्या सूत्रधारी कनवाळू प्रभूला नित्य नमन असो ! ज्या परम दयाळु श्रीसद्गुरु श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामींनी अस्वस्थ मन:स्थितीत अभय दिले व ग्रंथ लेखनास पात्र करून घेतले, त्यांना नमस्कार असो ! त्यांच्या थोर शिष्यांची श्री. गुळवणी महाराजांची प्रशस्ति असलेली, श्रीगुरुशिष्य सायंदेवसुत श्री. नागनाथ महाराजांचे श्री. विरूपाक्ष शिष्यवंशज श्री. विश्वनाथ केशव कुलकर्णी हत्तरवाडकर यांच्या गुरुप्रेम-पूरित अंत:करणांतून व्यक्त झालेली, 'श्रीदत्तप्रभु नमनावली' या ग्रंथांत समाविष्ट करण्याची सुसंधि लाभली, त्यामुळे परमेश्वरी जागृति हृद्य वाटते. या सर्वांस नमस्ते !

माझे बालमित्र श्री. ल. स. तथा नाना आजगांवकर यांनी आपुलकीनें आर्थिक बोजा उचलल्यामुळे, आज हा ग्रंथ प्रकाशित होत आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद ! श्री. दत्तोपंत इनामदार व त्यांचे सुपुत्र यांची व श्री. कृष्णराव मराठे व प्रेस-कामगार आणि इतरही ज्यांची ज्यांची या कार्यास हार्दिक मदत झाली आहे. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु !
॥ कल्याणं भवतु ॥

१४.२.१९६८

सर्वांचाच
**विष्णु गोपाळ नातु**